अल्लाहचे वचन

लेखक : मुहम्मद फारुख खान

भाषांतर: प्रा. अब्दुर्रहमान शेख

"अल्लाहच्या नावाने जो असीम दयावंत व परम कृपावंत आहे."

"अल्लाहचे वचन"

सुज्ञ वाचकांसाठी,

हा ग्रंथ वाचकांच्या हातात देताना आम्हाला अत्यानंद होत आहे. हा ग्रंथ हदीस कथनांचा एक लहानसा संग्रह आहे. कुदसी हदीस म्हणजे अशी प्रेषित वचनं की ज्यात प्रेषित मुहम्मद (स.) अल्लाहचे कथन सादर करतात.

कुदसी हदीस (प्रेषित वचनं) चे एक खास वैशिष्ट्य आहे आणि त्यांची एक विशिष्ट शैली आहे. त्यांना वाचतांना असे प्रतित होते की अल्लाह आपल्या दासांच्या अगदी जवळ येऊन संभाषण करीत आहे. हे संभाषण सुध्दा अति मधुर आणि गोड! जेणेकरून दास ईश्वराच्या तेजापासून आणि अल्लाहच्या प्रतापापासून भयभीत होऊ नये. त्याने आपल्या प्रभुची वचनं ऐकून सत्यमार्ग स्वीकारावा. तसेच अल्लाहचे स्मरण त्याच्या मनात अशा प्रकारे रूजावे की त्याने आपल्या जीवनात ईश्वराचे कधीही विस्मरण होऊ देऊ नये.

हदीस कुदसी मध्ये ज्या विषयांना घेतले आहे ते म्हणजे एकेश्वरत्व (तौहीद) एकाच ईश्वराचे ध्यान करणे, त्याच्याचसाठी जगणे आणि त्याच्याचसाठी मरणे, त्याच्याचजवळ प्रार्थना करणे आणि त्याच्याजवळच याचना करणे म्हणजेच एकेश्वरत्व होय.

एकेश्वरत्वानंतर अल्लाहच्या उपासनेविषयीचे स्पष्टीकरण आले आहे. तसेच सदाचरण आणि चांगल्या वर्तणुकीविषयीचे विवेचन आले आहे. तसेच पारलौकिक जीवनाविषयीचे स्पष्टीकरण विशेषकरून आले आहे. अल्लाहच्या भेटीविषयींसुध्दा खास उल्लेख आला आहे. ग्रंथात स्पष्ट करण्यात आले आहे की मनुष्याने आपल्या पालनकर्त्याची प्रसन्नता प्राप्त करण्यासाठी आणि पारलौकिक जीवनाच्या सफलता प्राप्त करण्यासाठी या जगात कधीही गाफील राहू नये.

या ग्रंथाला पूर्णत्वास नेण्यात आमचे बंधु मुहम्मद अहमद साहेब यांचा मोलाचा वाटा आहे. यासाठी मी त्यांचा आभारी आहे.

आशा करतो की सुज्ञ वाचक या ग्रंथाचा पुरेपूर उपयोग करून घेतील. अल्लाह आमच्या प्रयत्नांना यश देवो.

– मुहम्मद फारूख खान

सांकेतिक शब्दार्थ

या ग्रंथात काही सांकेतिक शब्द संक्षिप्त रीतीने कंसात लिहिलेले आढळतील. वाचकांना सुरवातीलाच त्यांचा शब्दार्थ जाणून घेणे जरूरीचे आहे. वाचतांना त्यामुळे काही अडचण भासणार नाही. ते शब्द खालीलप्रमाणे आहेत.

(अ) – म्हणजे ''अलैहिस्सलाम'' याचा अर्थ होतो ''त्यांच्यावर शांती असो'' प्रेषित आणि दूतांच्या नावापुढे कंसात **(अ.)** हे संक्षिप्त रूप येते. हा आदर आणि प्रेमसुचक शब्द आहे.

(र) – याचे पूर्ण रूप आहे ''रजिअल्लाहहु अनहु'' याचा अर्थ आहे ''अल्लाह त्यांच्याशी प्रसन्न होवो. सहाबी (प्रेषितांचे साथी) यांच्या नावापुढे ही आदर आणि प्रेम सुचक प्रार्थना आहे.

(स) – याचे पूर्ण रूप आहे ''सल्लल् लाहु अलैहि वसल्लम'' याचा अर्थ आहे ''अल्लाह त्यांच्यावर कृपेचा आणि शांतीचा वर्षाव करो.'' प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या नावापुढे कंसात हा संक्षिप्त शब्द आदर आणि प्रेम सुचक प्रार्थना आहे.

सहाबी – प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या साथीदारांना म्हटले जाते. सहाबीचे अनेक वचन 'सहाबा' आणि स्त्रीलिंगी रूप 'सहाबिया' असे आहे.

एकेश्वरत्व (तौहिद)

१) माननीय अबू दरदा (र.) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाहतआला म्हणतो की, माझा, दूतांचा आणि माणसांचा मामला अजब असा आहे. मी त्यांना निर्माण करतो आणि हे माझ्याऐवजी दुसऱ्यांची पूजा–अर्चा करतात. मी याना उपजीविका देतो आणि यांचे पालन करतो परंतु आभार मात्र हे दुसऱ्यांचे मानतात.'' *(जामे सगीर)*

२) माननीय अनस (र.) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''तुमचा पालनकर्ता म्हणतो की, मी या गोष्टीला पात्र आहे की लोकांनी माझेच फक्त भय बाळगून असावे आणि माझ्याव्यतिरिक्त इतर कुणालाही पूजनीय बनवू नये. म्हणून जो कोणी मनुष्य इतर कुणाला पूजनीय बनविण्यापासून अलिप्त राहिला आणि त्याने माझीच फक्त पुजा–अर्चा केली तर मला हेच योग्य आहे की मी अशा मनुष्याला मुक्ती द्यावी.'' *(अहमद, तिरमिजी, नसई)*

३) माननीय उम्मेहानी (र.) यांचे कथन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''कयामतच्या दिवशी अल्लाह पुकारून म्हणेल की, हे अल्लाहला एक मान्य करणारांनो! तुम्ही एकमेकांचे अपराध माफ करा आणि तुमचा मोबदला आणि बक्षीस तुम्हाला देणे ही माझी जबाबदारी आहे.'' *(तबरानी)*

४) माननीय अबु हुरैरा (र.) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''तुमचा पालनकर्ता म्हणतो की, माझे दास माझी भक्ती आणि आज्ञापालन जर पूर्णरूपेन करत असतील तर मी रात्री त्यांच्यावर पावसाचा वर्षाव करीन आणि दिवसा कार्यमग्नतेसाठी उन्हाचा वर्षाव करीन आणि विजेच्या कडकडाटापासून त्यांना सुरक्षित ठेवीन.'' *(अहमद, हाकिम)*

५) माननीय वहब बिन मुनब्बे (र.) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, संपूर्ण जमीन व आकाश मला सामावून घेऊ शकत नाही, परंतु एका ईमानधारकाच्या ह्रदयात मी मात्र सामावलेला आहे.'' *(अहमद)*

अनेकेश्वरत्व (शिर्क)

१) माननीय अनस (र.) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, हे आदमच्या संततीनो! तुम्ही जोपर्यंत मला पुकारत राहाल आणि माझ्याशी आस लावून बसाल, मी तुम्हाला क्षमादान देत

राहीन. मग तुम्ही कोणत्याही स्थितीत असा, मला त्याची पर्वा नाही. हे आदमपुत्र! तुझे अपराध आकाशाएवढे जरी असतील आणि तू माझी क्षमायाचना करशील तर मी क्षमा करीन आणि मला काही पर्वा नाही. हे आदमपुत्रा! जर तू माझ्याशी अशा स्थितीत भेटला की जमीन भर अपराध तू केले आहेस परंतु त्यांत अनेकेश्वरत्वासारखा विद्रोह नसेल तर मी तुला क्षमादान करीन.'' *(तिरमिजी)*

२) माननीय इब्न अब्बास (र.) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले आहे, ''अल्लाह म्हणतो की, ज्या व्यक्तीची ही धारणा आहे की अल्लाह त्याचे अपराध क्षमा करण्याचे सामर्थ्य बाळगून आहे तर मी त्याला क्षमा करीन आणि काही पर्वा करीत नाही. अट हीच आहे की त्याने माझ्या बरोबरीचा अथवा माझा भागीदार दुसऱ्या कुणालाही समजू नये.'' (शरहुस्सुन्नह)

३) माननीय अबू जर (र.) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, हे आदमपुत्र! जोपर्यंत तू माझी भक्ती आणि आज्ञाधारकता करीत राहशील आणि माझ्याशी आशा ठेवील तसेच इतरांना माझा भागीदार ठरविणार नाही तर मी तुला क्षमा करत राहीन. तू आकाशाएवढे आणि जमीन भरून अपराध करून माझ्यासमोर उभा राहिला तर मी तुझ्यासाठी तेवढे क्षमादान करील आणि काहीही पर्वा करणार नाही.'' *(तबरानी)*

४) माननीय अयाज बिन हिमार (र.) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी एकदा आपल्या प्रवचनात लोकांना सावध केले, ''जाणून असा, माझ्या प्रभुने मला आदेश दिला आहे की मी तुम्हाला ते सर्व सांगावे जे तुम्ही जाणत नाही. अल्लाहने आजच याविषयीचे दिव्य अवतरण मला केले आहे. अल्लाह म्हणतो, ''जी संपत्ती मी आपल्या दासाला दिली आहे ती त्याच्यासाठी वैध आहे. माझ्या सर्व दासांना मी सत्याची आंतरिक ओढ असलेले निर्माण केले आहे. परंतु सैतानाने त्यांना त्यांच्या धर्मापासून दूर नेले आणि त्यांना मार्गभ्रष्ट केले. मी जे दासांसाठी वैध ठरवले ते सैतानाने त्यांच्यासाठी अवैध केले. सैतानाने मार्गभ्रष्ट लोकांना माझ्याबरोबर दुसऱ्यांना भागीदार बनविण्यासाठीचा आदेश दिला. यासाठी मी कोणतेही प्रमाण उतरविलेले नाही. मी पृथ्वीतील लोकांकडे एक नजर टाकली तर काही ग्रंथधारकच धर्मनिष्ठ होते. इतर अरब आणि अरबेतर लोकांना पाहून मी क्रोधित झालो. मी तुला याचसाठी पृथ्वीवर पाठविले की तुझी परीक्षा घ्यावी आणि तुझ्यामुळे अनुयायी–समाजाची परीक्षा घ्यावी. मी तुझ्यावर ग्रंथ अवतरित केला ज्यास जल नष्ट करू शकत नाही, ज्याचे पठण तू रात्रंदिवस करतो. अल्लाहने मला आदेश दिला की मी कुरैशला नष्ट करावे. मी सांगितले की हे अल्लाह! मी जर असे

केले तर ते माझे डोके झोडून झोडून भाकरीसारखे करतील. अल्लाहने मला आदेश दिला की तुला त्यांनी ज्या प्रकारे बाहेर काढले तसेच तू त्यांना बाहेर काढ. त्यांच्याशी युध्द कर तुझी मदत आम्ही करू. तू आपल्या सैन्यावर खर्चकर आम्ही तुझ्यावर खर्च करू. तू त्यांच्यावर सैन्य पाठवून हल्ला कर, आम्ही पाच पटीने आमचे सैन्य पाठवून मदत करू. आपल्या आज्ञाधारक अनुयायींना बरोबर घेऊन त्यांच्याशी युध्द कर ज्यांनी तुझी अवज्ञा केली आहे.'' *(मुस्लिम)*

५) माननीय अबू हुरैरा (र.) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, मी सर्व भागीदारांच्या विद्रोहापेक्षा बेपर्वा आहे की मी कुणाला माझा भागीदार बनवावे. ज्याने काही कर्म केले आणि त्यात (कार्यसिध्दी) दुसऱ्या कुणाला माझा भागीदार ठरविले तर मी त्याला आणि त्याने ठरविलेल्या भागीदाराला (भटकण्यासाठी) सोडून देतो.'' *(मुस्लिम)*

६) माननीय अबु हुरैरा (र.) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, ज्याने एखाद्या कार्यसिध्दीत दुसऱ्या कुणाला माझ्याबरोबर भागीदार ठरविले तर मी अशा व्यक्तीशी विरक्त होतो. ते कार्य ज्याच्यासाठी त्याने केले त्याच्याशी माझा काही एक संबंध राहात नाही.'' *(मुस्लिम)*

७) माननीय अनस (र.) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''सृष्टी निर्माणकर्ता अल्लाह म्हणतो, तुझ्या समुदायाचे लोक नेहमी म्हणत राहातील की हे कसे झाले आणि ते कसे झाले ? ते आपल्या (शासकवृत्तीने) इथपावतो म्हणतील की या सृष्टीचा निर्माता तर अल्लाह आहे तर मग अल्लाहला कोणी निर्माण केले आहे?'' *(मुस्लिम)*

८) माननीय अबू हुरैरा (र.) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, आदमपुत्र काळचक्राला दोष देवून मला त्रस्त करीत आहे. मीच कालचक्र आहे. सर्व कर्मांचे फळ देणे माझ्याच हातात आहे. मीच रात्र व दिवसाला आलटून पालटून आणतो.'' *(बुखारी, मुस्लिम)*

९) माननीय अबु हुरैरा (र.) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, आदमपुत्राने मला खोटे ठरविले. हे त्याच्यासाठी उचित नव्हते. त्याने मला वाईट संबोधले जेव्हा की असे करणे त्याच्यासाठी उचित नव्हते. तो मला खोटे ठरवित म्हणतो, अल्लाहने ज्याप्रमाणे मला प्रथमत: निर्माण केले परंतु दुसऱ्यांदा कदापि निर्माण करू शकणार नाही. (मृत्युनंतर) माझ्यासाठी त्याला प्रथमत: निर्माण करणे हे कार्य दुसऱ्यांदा (मृत्युनंतर) निर्माण करणे अवघड

कार्य नाही. तो मला वाईट संबोधन करून म्हणतो की अल्लाहने स्वत:चा पुत्र निर्माण केला आहे. जेव्हा की मी एकमेव आहे. निरपेक्ष आहे आणि मी सर्वांचा आश्रय आहे. मी कुणापासून जन्माला आलो नाही की कुणाला मी जन्म दिला नाही आणि माझा समकक्ष इतर कोणी ही नाही.

इब्ने अब्बासनुसार, एका दुसऱ्या निवेदनात असा शब्दप्रयोग आला आहे की ''त्याने मला वाईट संबोधन करणे म्हणजे तो माझ्यासाठी एक पुत्र घोषित करीत आहे. परंतु हे माझ्या श्रेष्ठत्वाच्या प्रतिकूल आहे की माझी कोणी पत्नी असावी अथवा मुलगा असावा.'' *(बुखारी)*

१०) माननीय खालिद बिन जुहनी (र.) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी प्रात:कालीन (फजर) च्या नमाजमध्ये आमचे नेतृत्व केले. त्या रात्री पाऊस पडला होता. नमाजनंतर प्रेषितांनी लोकांना विचारले, तुमच्या निर्माणकर्त्याने काय सांगितले हे तुम्हाला माहीत आहे? लोकांनी उत्तर दिले, अल्लाह आणि त्याचे प्रेषित यांनाच अधिकतर माहीत आहे. प्रेषितांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, माझे काही दास अशा स्थितीत प्रात:काळी उठले की ते श्रध्दावंत होते आणि काही अश्रध्दावंतच्या स्थितीत. ज्यांनी असे म्हटले की अल्लाहच्या कृपेने आणि दयेने पावसाचा वर्षाव झाला, ते माझ्यावर श्रध्दा ठेवणारे आहेत. आणि ज्यांनी असे म्हटले की अमक्या नक्षत्रामुळे हा पाऊस पडला तर त्यांनी माझ्याशी विद्रोह केला कारण ते नक्षत्रावर श्रध्दा ठेवून आहेत.'' *(बुखारी, मालिक, नसई)*

११) माननीय अबू हुरैरा (र.) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, जेव्हा कधी मी आपल्या दासांना उपकृत केले तर त्यांच्यात दोन गट पडले. एका गटाने माझ्यावर श्रध्दा ठेवली आणि नक्षत्रांना नाकारले. दुसऱ्या गटाने नक्षत्रांना मान्य केले व त्यांच्यावर श्रध्दा ठेवली आणि माझ्याशी विद्रोह केला.'' *(नसई)*

हासुध्दा ईशद्रोह (अनेकेश्वरत्व) आहे!

१)माननीय अबू हुरैरा (र.) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले की अंतिम वेळी असे लोक निर्माण होतील जे धर्माचा आधार घेऊन भौतिक जगाच्या मागे लागतील. जगाला दाखविण्यासाठी साधुवस्त्र परिधान करतील, त्यांची बोली साखरेपेक्षा जास्त गोड असेल, परंतु दगडापेक्षा जास्त कठोर त्यांचे हृदय असेल. अल्लाह अशा लोकांबद्दल म्हणेल, ''हे लोक मी दिलेल्या सवलतीमुळे धोका खात आहेत आणि माझा विरोध करण्याचे धाडस करीत आहेत.

मी शपथेवर सांगतो की मी भयानक उपद्रव निर्माण करील की ज्यामुळे मोठमोठे विद्वान आणि सहनशील लोक अचंबित होतील.'' *(तिरमिजी)*

२) माननीय अबू हुरैरा (र.) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले आहे की महाप्रलयाच्या दिवशी सर्वप्रथम ज्या व्यक्तीला खोटे ठरविले जाईल ती व्यक्ती हुतात्मा (शहीद) असेल. अल्लाहसमोर जेव्हा त्याला हजर केले जाईल तेव्हा अल्लाह आपल्या सर्व कृपाप्रसादांचा त्याच्यासमोर उल्लेख करील. तो मान्य करील तेव्हा अल्लाह म्हणेल, ''तू यासाठी आभार प्रदर्शित कसे केले?'' तो मनुष्य सांगेल, ''मी तुझ्यासाठी लढत लढत हुतात्मा झालो.'' अल्लाह म्हणेल, ''तू खोटारडा आहेस. तू तर लढला यासाठी की जगाने तुला शूर म्हणावे. तुला जगात शूर म्हटले गेले.'' यानंतर त्याच्यासाठी आदेश दिला जाईल. त्याला तोंडघशी पाडून फरफटत ओढत आगीत फेकले जाईल.

नंतर ती व्यक्ती असेल ज्याने ज्ञान प्राप्त केले आहे आणि दुसऱ्याला ज्ञानदान केले आणि कुरआन पठण केले. जेव्हा त्या माणसाला अल्लाहपुढे हजर केले जाईल तेव्हा अल्लाह आपल्या सर्व कृपाप्रसादांचा त्याच्यासमोर उल्लेख करील आणि तो मान्य करील तेव्हा अल्लाह म्हणेल, ''तू यासाठी आभार प्रदर्शित कसे केले?'' तो मनुष्य सांगेल, ''मी ज्ञान संपादन केले आणि इतरांना ज्ञानदान केले आणि तुझ्यासाठी कुरआन पठण केले.'' अल्लाह म्हणेल, ''तू खोटारडा आहेस, तू ज्ञान प्राप्ती यासाठी केली की लोकांनी तुला विद्वान म्हणावे आणि कुरआन पठण यासाठी केले की लोकांनी तुला कारी म्हणावे. लोकांनी तुला विद्वान आणि कारी म्हटलेले आहे.'' यानंतर त्याच्यासाठी आदेश दिला जाईल. त्या माणसाला (ढोंगी) तोंडघशी पाडून फरफटत ओढून आगीत फेकले जाईल.

नंतर ती व्यक्ती असेल ज्याला अल्लाहने भरपूर संपत्ती दिली होती. जेव्हा त्याला अल्लाहसमोर हजर केले जाईल तेव्हा अल्लाह आपल्या सर्व कृपाप्रसादांचा त्याच्यासमोर उल्लेख करील आणि ती व्यक्ती ते मान्य करील. तेव्हा अल्लाह विचारणा करील, ''तू यासाठी आभार प्रदर्शित कसे केले?'' तो मनुष्य म्हणेल, ''मी तुझ्यासाठी माल (धनसंपत्ती) खर्च केली. मी असा कोणताच मार्ग सोडलेला नाही जिथे मला तुझ्यासाठी संपत्ती खर्च करणे आवडले होते.'' अल्लाह म्हणेल, ''तू खोटारडा आहेस, तू तर संपत्ती यासाठी खर्च केली की लोक तुला दानशूर म्हणतील. लोकांनी तुला दानशूर अशी प्रसिध्दी दिली.'' यानंतर त्या व्यक्तीसाठी आदेश दिला जाईल. त्या ढोंगी माणसाला तोंडघषी पाडून फरफटत ओढत आगीत फेकले जाईल. *(मुस्लिम)*

नशीब

१) माननीय अबू अब्दुल्लाह (र.) यांचे निवेदन आहे, मी अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांना असे सांगताना ऐकलेले आहे की अल्लाहने आपल्या उजव्या मुठीत एका जनसमूहाला आणि दुसऱ्या मुठीत दुसऱ्या जनसमूहाला घेऊन म्हटले, ''हे स्वर्गासाठी आणि ते नरकासाठी आहेत.'' *(अहमद)*

२) माननीय अनस (र.) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, अल्लाह म्हणतो की, जो माझ्या निर्णयाशी आणि मी निश्चित केलेल्या नशिबाशी समहत नसेल त्याने तर माझ्याव्यतिरिक्त दुसरा पालनकर्ता शोधावा.'' *(बैहकी, तबरानी)*

एका हदीस कथनानुसार अल्लाह म्हणतो, ''जो मनुष्य माझ्या निर्णयावर आणि आदेशावर खूश नाही आणि मी पाठविलेल्या संकटांवर आणि आपत्तीवर संयम राखणार नाही तर अशा माणसाने आपला पालनकर्ता दुसरा कुणी शोधावा.'' *(तबरानी, अबु दाऊद)*

३) माननीय अबू हुरैरा (र.) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, नवस (दुसऱ्याला) केल्याने नशिबात नसलेले प्राप्त होत नाही. नवसामुळे मी त्याला त्याच्या नशिबात ती गोष्ट प्रलंबित करतो आणि कंजूष माणसाच्या हाताने दान देणे त्याच्या नशिबात लिहितो. कंजूष दान द्यावयास सुरु करतो. पूर्वी मात्र कंजूषी करत होता.'' *(अहमद, बुखारी, नसई)*

अल्लाहवर विश्वास ठेवणे

१) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, मी माझ्या दासाच्या निष्ठेबरोबर आहे. जेव्हा तो मला स्मरण करतो तेव्हा मी त्याच्याजवळ असतो. तो जेव्हा त्याच्या मनात माझे स्मरण करतो. तेव्हा मीसुध्दा माझ्या मनात त्याची आठवण करतो. तो जर एखाद्या जनसमूहात माझी आठवण करतो तेव्हा मी त्याची उच्च अशा समूहात चर्चा करतो. जेव्हा दास माझ्याकडे एक पाऊल पुढे येतो तेव्हा मी एक हात भर त्याच्याकडे येतो. जेव्हा एखादा दास एक हातभर माझ्याकडे येतो तेव्हा मी दोन हात त्याच्याकडे जवळ जातो. एखादा दासजर माझ्याकडे हळू हळू चालून येत असेल तर मी धावत त्याच्याकडे जातो.'' (बुखारी, मुस्लिम, तिरमिजी)

२) माननीय अनस (र.) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.)

यांनी सांगितले, ''सर्वशक्तिमान अल्लाह म्हणतो की, मी आपल्या दासाच्या निष्ठेबरोबर आहे. त्याने ज्याप्रकारे वाटेल तशी निष्ठा ठेवावी.'' *(बहकी)*

३) माननीय अबू हुरैरा (र.) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''सर्वशक्तिमान अल्लाह म्हणतो की, मी आपल्या दासाच्या निष्ठेबरोबर आहे. त्याने चांगली निष्ठा ठेवली तर ती त्याच्याचसाठी चांगली आहे आणि वाईट प्रकारे ठेवली तर त्याच्यासाठीच वाईट आहे.'' *(अहमद, मुस्लिम)*

४) माननीय अबू हुरैरा (र.) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''सर्वशक्तिमान अल्लाह म्हणतो की, मी आपल्या दासाच्या निष्ठेबरोबर आहे. तो मला जेव्हा स्मरण करतो मी तिथे त्याच्याबरोबर असतो. मी दासाच्या पश्चाताप व्यक्त करण्यावर प्रसन्न होतो. एखाद्या व्यक्तीचा हरवलेला उंट मैदानात सापडला तेव्हा त्याला जितका आनंद होतो त्यापेक्षा अधिक पटीने मी प्रसन्न होतो. माझ्याकडे तो एक फूट जवळ येतो मी त्याच्याकडे एक हात भर जवळ येतो. जो माझ्याकडे एक हातभर जवळ येतो मी त्याच्याकडे दोन हात जवळ जातो आणि जो माझ्याकडे चालून येतो मी त्याच्याकडे धावून जातो.'' *(बुखारी)*

५) माननीय अबू हुरैरा (र.) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, मी आपल्या दासाच्या निष्ठेबरोबर आहे. तो जेव्हा माझे स्मरण करतो तेव्हा मी त्याच्या जवळ असतो.'' *(तिरमिजी)*

६) माननीय वसिला बिन अस्कह (र.) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले आहे की अल्लाह म्हणतो, ''मी आपल्या दासाच्या निष्ठेबरोबर आहे ज्याप्रकारे तो माझ्यावर निष्ठा ठेवतो. जर चांगली निष्ठा आहे तर त्याच्याबरोबर चांगला व्यवहार केला जातो. जर वाईट प्रकारे निष्ठा ठेवली असेल तर त्याच्याशी वाईट व्यवहार केला जातो.'' *(तबरानी)*

७) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''सर्वशक्तिमान अल्लाह म्हणतो की, जेव्हा कधी माझा दास मला भेटू इच्छितो तेव्हा मलापण त्याला भेटण्याची इच्छा होते. जर कोणी मला भेटणे पसंत करत नाही तर मीसुध्दा त्याला भेटणे नापसंत करतो.'' (बुखारी, नसई)

८) इब्न अब्बास (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, ''मी आपल्या दासाच्या हक्कासाठी स्वत:ला जबाबदार ठरवत नाही. जोपर्यंत तो दास माझ्या हक्कांचा आणि अधिकारांचा सन्मान करत नाही.'' *(तबरानी)*

९) माननीय अबू हुरैरा (र.) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, अल्लाह एका दासाला नरकात जाण्याचा आदेश देईल. जेव्हा तो नरकाच्या दारावर पोहचेल तेव्हा पाठीमागे वळून पाहील आणि म्हणेल, ''हे माझ्या पालनकर्त्या, मी तर तुझ्यावर निष्ठा ठेवून होतो.'' अल्लाह म्हणेल, ''त्याला परत फिरवा, मी माझ्या दासाच्या निष्ठेबरोबर आहे. नंतर त्याला माफ केले जाईल.'' *(बैहकी)*

अल्लाहचे स्मरण

१) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, जेव्हा माझा दास माझे स्मरण करतो तेव्हा त्याचे दोन्ही ओठ माझे स्मरण करताना हालतात अशा वेळी मी त्याच्या जवळ असतो.''
(इब्न माजा)

२) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, हे आदमपुत्र! तू माझे स्मरण केले तर तू माझे आभार प्रकट केले, परंतु जर तू मला विसरलास (माझे स्मरण केले नाही) तर तू माझ्याशी कृतघ्नता व्यक्त केली आणि विद्रोही बनला.'' *(तबरानी)*

३) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाहच्या दूतसमूहांपैकी काही दूतसमूह असे आहेत की ते अल्लाहचे स्मरण करणाऱ्या चर्चासत्राला शोधत असतात. ते जेव्हा असे दूतसमूह शोधतात जिथे अल्लाहची चर्चा चालू असतें तेव्हा ते दूत तिथे बसून असतात. ते आपापले पंख फैलावतात येथपावेतो की आकाशाला पंख भिडतात.''

जेव्हा अल्लाहच्या या चर्चासत्राला समाप्त करून लोक जाऊ लागतात तेव्हा हे दूत आकाशाकडे जातात. सर्वज्ञानी अल्लाह त्यांच्याशी वार्तालाप करतो, ''तुम्ही कोठून आलात?'' ते सांगतात, पृथ्वीवरील तुझ्या अशा काही दासांजवळून आम्ही येत आहोत जे तुझी महानता आणि तुझ्या श्रेष्ठत्वाची चर्चा करीत होते आणि तुलाच पूज्य मानून पुकारत होते आणि तुझी प्रशंसा करीत होते आणि तुझपाशी काही मागत होते. अल्लाह म्हणतो, ''ते माझ्याशी काय मागत होते?'' ते उत्तरले, तुझे दास तुझ्याशी स्वर्गप्राप्तीची याचना करत होते. अल्लाह म्हणतो, ''त्यांनी जन्नत पाहिली आहे काय?'' दूत नकारात्मक उत्तर देतात. अल्लाह म्हणतो, ''त्यांनी जर जन्नत पाहिली तर त्यांची काय दशा होईल? दूत अल्लाहला संबोधून म्हणतात, ते सर्वजण तुझ्याजवळ मुक्तीची याचना करीत होते. अल्लाह म्हणतो, ''कोणत्या गोष्टीपासून ते मुक्ती मागत होते?'' ते दूत उत्तर देतात, जहन्नमपासून! अल्लाह

म्हणतो, ''त्यांनी जहन्नम पाहिला आहे काय?'' दूत नाही म्हणतात. अल्लाह म्हणतो, ''त्यांनी जर जहन्नम पाहिला तर त्यांची काय दशा होईल?'' दूत सांगू लागतात, ते सर्वजण तुझे दास तुझी क्षमा मागत होते.''

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''यावर अल्लाह म्हणतो की, मी त्या सर्वांची क्षमा कबूल केली आणि त्यानी जे काही मागितले ते त्यांना देऊन टाकले आणि ज्यापासून त्यांनी मुक्ती मागितली त्यापासून त्यांना मुक्त केले.''

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''दूत तेव्हा म्हणतील, प्रभो! त्यांच्यात एक मोठा अपराधी व्यक्तीसुध्दा होता. तो रस्त्याने जात होता आणि तसाच या लोकात बसला. तेव्हा अल्लाह म्हणेल की, मी त्यालाही मुक्ती प्रदान केली. ते सर्वजण असे लोक आहेत ज्यांच्याजवळ बसणारासुध्दा दुर्दैवी असू शकत नाही.''
(मुस्लिम, बुखारी, तिरमिजी, नसई)

४) माननीय इब्न उमर (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, ज्या व्यक्तीने माझ्या निरंतर स्मरणात राहून माझ्याशी काही एक मागितले नाही तर मी अशा दासाला मागणाऱ्यापेक्षा जास्त देतो.'' *(बुखारी, बैहकी)*

५) माननीय इब्न अब्बास (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, एखादा दास जर मला एकांतपणे स्मरण करतो तर मीसुध्दा त्याची आठवण एकांतात करतो. एखादा दास माझ्या जनसमूहात स्मरण करतो तेव्हा मी त्याची आठवण उत्कृष्ट समूहात करतो.'' *(बैहकी)*

६) माननीय उमर (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, माझा पात्र दास तो आहे जो माझे अशा स्थितीत स्मरण करतो. जेव्हा तो शत्रुशी मुकाबला करतो.'' *(तिरमिजी)*

७) माननीय मआज बिन अनसार (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, जेव्हा एखादा दास मला त्याच्या मनात स्मरण करतो तर मी सामान्य दूतांच्या समूहात त्याची आठवण करतो. आणि जेव्हा एखादा दास मला जनसमूहात स्मरण करतो तेव्हा मी माझ्या विशिष्ट दूतांच्या समूहात त्याची आठवण करतो.'' *(तबरानी)*

अल्लाहची दयाशीलता

१) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाहने लोकनिर्माण कार्य करण्याचा निश्चय केला तेव्हा एक ग्रंथ लिहिला आहे. तो ग्रंथ राजसिंहासनाधिष्ठित अल्लाहजवळ ठेवलेला आहे. त्यात लिहिलेले आहे की, निश्चितच माझी दयालुता ही माझ्या कोपपेक्षा जास्त आहे.''

एक हदीस कथन आहे, ''माझी दया ही माझ्या कोपपेक्षा वरचढ आहे.''

(बुखारी, मुस्लिम)

२) माननीय सोबान (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले आहे की जेव्हा दास अल्लाहच्या प्रसन्नतेसाठी निरंतर प्रयत्नशील राहतो तेव्हा सर्वशक्तिमान अल्लाह जिब्रईल (अ) यांना सांगतो, ''माझा अमुक अमुक दास माझ्या प्रसन्नताप्राप्तीसाठी कार्यमग्न आहे. ओळखून असा, माझ्या दयेचा वर्षाव त्याच्यावर होणारच.''

यावर आदरनीय जिब्रईल (अ.) सांगू लागतात, अमुक अमुक व्यक्तीवर अल्लाहच्या दयेचा वर्षाव होत राहो. तसेच राजसिंहासनाला उचलून धरणारे सर्व दूतसुध्दा हेच उच्चारतात. मग सातही आकाशांतील सर्व रहिवासी उचारु लागतात. अंतत: अल्लाहची दया त्याच्यासाठी पृथ्वीवर अवतरित होते.'' *(अहमद)*

३) माननीय अबू सईद खुदरी (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले आहे की धिक्कारीत सैतानाने अल्लाहसमोर सांगितले, ''मी तुझ्या सामर्थ्याची शपथ घेऊन सांगतो की जोपर्यंत तुझ्या दासांचे प्राण त्यांच्या शरीरात राहतील मी त्यांना मार्गभ्रष्ट करत राहीन. अल्लाहने उत्तर दिले, ''माझ्या सामर्थ्याची तेजाची आणि प्रतिष्ठेची शपथ घेऊन सांगतो की जोपर्यंत माझे दास माझ्याशी क्षमा–याचना करीत राहतील तोपर्यंत मी त्यांना क्षमा करीत जाईन.''

(अहमद)

४) माननीय अबू जर (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, हे माझ्या दासांनो! मी अत्याचाराला माझ्याशी अवैध ठरविले आहे. आणि मी तुमच्यासाठीसुध्दा अत्याचाराला अवैध ठरविले आहे. म्हणून तुम्ही एकमेकांवर अत्याचार करू नका. हे माझ्या दासांनो! तुम्ही सर्व मार्गभ्रष्ट आहात, त्या व्यक्तीव्यतिरिक्त ज्याला मी मार्ग दाखविला. (ह्याचा अर्थ असा की मनुष्य स्वबळावर मार्गभ्रष्टतेपासून वाचू शकत नाही, जोपर्यंत तो स्वयम् अल्लाहने दाखविलेल्या मार्गाचे अनुसरण करत नाही.) तुम्ही माझ्याशी मार्गदर्शनासाठी याचना

करा. मी तुम्हाला सरळमार्ग दाखविन आणि मार्गदर्शन करीन. हे माझ्या दासांनो! तुम्ही सर्वजण उपासी आहात, त्या व्यक्तीव्यतिरिक्त ज्याला मी खाऊ घातले. म्हणून माझ्याजवळच उपजीविका मागा. मी तुम्हाला उपजीविका देईन. हे माझ्या दासांनो! तुम्ही सर्वजण उघडे (वस्त्रहीन) आहात, त्या व्यक्तीव्यतिरिक्त ज्याला मी वस्त्र परिधान केले.. म्हणून माझ्याजवळ वस्त्र मागा मी तुम्हाला वस्त्र परिधान करीन. हे माझ्या दासांनो! तुम्ही रात्रंदिवस अपराध करता आणि मी तुमचे सर्व अपराध क्षमा करतो. म्हणून तुम्ही माझीच क्षमायाचना करा. मी तुम्हाला क्षमा करीन. हे माझ्या दासांनो! तुम्ही मला काही हानी पोहचू शकत नाही की काही लाभ पोहचू शकत नाही. हे माझ्या दासांनो! तुमचे सर्व मागील आणि पुढील लोक, तसेच सर्व मानव आणि जिन्न सर्वजण मिळून महान आणि ईशपरायण बनले तरी माझ्या बादशाहीत यामुळे काही एक फरक पडणार नाही. हे माझ्या दासांनो! तुमचे मागील पुढील लोक, तसेच सर्व मानव आणि जिन्न सर्वजण एक महान दुस्साहसी आणि मर्यादाहीन बनले तरी माझ्या बादशाहीत यामुळे काही एक फरक पडणार नाही. हे माझ्या दासांनो! तुमचे मागील व पुढील लोक तसेच सर्व मानव आणि जिन्न सर्वजण एका मैदानात एकत्रित उभे राहून माझ्याशी याचना करू लागले आणि मी प्रत्येकाला तो जे मागेल ते देत राहीन तरी माझ्या तिजोरीत काहीच कमी होणार नाही. समुद्राच्या पाण्यात सुई बुडविल्यानंतर त्याला लागून पाणी येते जितके पाणी कमी होते, त्याच प्रमाणात कमी होईल. हे माझ्या दासांनो! हे तर तुमचेच कर्मफळ आहे ज्याला मी तुमच्यासाठी मोजत असतो. मग मी तुम्हाला त्याचा पूर्ण मोबदला देईन. म्हणून जो कोणी चांगले फळ प्राप्त करील त्याने अल्लाहची प्रशंसा करावी. आणि ज्याने वाईट फळ प्राप्त केले त्याने स्वत:लाच दोष द्यावा.'' *(मुस्लिम)*

५) माननीय अबू जर (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, हे माझ्या दासांनो! तुमच्यापैकी प्रत्येकजण मार्गभ्रष्ट आहे शिवाय त्या व्यक्तीच्या ज्याला मी मार्ग दाखविला. म्हणून तुम्ही माझ्याशी मार्गदर्शन प्राप्त करण्याची याचना करा, मी तुम्हाला सरळमार्ग दाखवीन व तुम्हाला मार्गदर्शन करीन. तुमच्यापैकी प्रत्येकजण निर्धन आहे शिवाय त्या व्यक्तीच्या ज्याला मी धनवान केले. म्हणून तुम्ही माझ्याशी उपजीविकेची याचना करा, मी तुम्हाला उत्तम उपजीविका देईन. तुमच्यापैकी प्रत्येकजण अपराधी आहे शिवाय त्या व्यक्तीच्या ज्याला मी वाचविले. म्हणून तुमच्यापैकी ज्या कुणाला हे ज्ञात आहे की माझ्यात क्षमा करण्याचे आणि मुक्ती देण्याचे सामर्थ्य आहे. तेव्हा ती व्यक्ती माझ्याशी क्षमायाचना करते आणि मुक्तीसाठी प्रार्थना करत राहते. मी त्याचे अपराध क्षमा

करतो. तुमचे मागील पुढील लोक आणि मृतक आणि जीवित लोक, तसेच बलशाली आणि बलहीन सर्व लोक एकत्र येऊन माझ्या प्रिय दासाप्रमाणे ईशपरायण बनले तरी माझ्या बादशाहीत डासाच्या पंखाएवढीसुध्दा भर पडणार नाही. तसेच तुमचे मागील पुढील लोक आणि मृत व जीवित लोक, तसेच बलशाली आणि बलहीन सर्व लोक एकत्र येऊन माझ्या विद्रोही दासाप्रमाणे द्रोही बनून राहिले तरी माझ्या बादशाहीत डासाच्या पंखाएवढीसुध्दा कमी होणार नाही. मी अत्यंत दानशील आहे आणि यशस्वी आहे जे वाटेल ते करतो. माझी कृपासुध्दा सांगणे आहे आणि कोपसुध्दा सांगणे आहे. मी जेव्हा एखादी गोष्ट घडण्याची इच्छा करतो तेव्हा मी फक्त म्हणतो की तथास्तु आणि ती गोष्ट अस्तित्वात येते.''

(तिरमिजी, अहमद, अब्नमाजा)

६) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, अल्लाहचा एखादा दास अपराध केल्यानंतर त्वरित त्याची क्षमा मागतो, तेव्हा अल्लाह म्हणतो की, ''माझा दास जाणून आहे काय की त्याचा कोणी निर्माणकर्ता आहे जो अपराधाची क्षमा करतो आणि अपराधासाठीची पकडसुध्दा करतो. मी माझ्या दासाला क्षमा केली.'' जोपर्यंत अल्लाह इच्छितो दास अपराधापासून व गुन्ह्यांपासून दूर राहतो. जेव्हा दास गुन्हा करतो आणि त्वरित क्षमा मागतो की हे माझ्या प्रभू, माझ्या हातून गुन्हा घडला आहे तू क्षमा कर. अल्लाह म्हणतो, ''माझा दास जाणून आहे काय की त्याचा कोणी निर्माणकर्ता आहे. जो गुन्हा माफ करतो आणि गुन्ह्याची शिक्षासुध्दा देतो. मी आपल्या दासाला क्षमा केली.''

यानंतर काही काळ ज्याचे ज्ञान अल्लाहला आहे, तो दास गुन्ह्यांपासून दूर राहतो. नंतर तो गुन्हा करतो. आणि म्हणतो हे माझ्या प्रभू मी गुन्हा केला आहे मला माफ कर. मग अल्लाह म्हणतो, ''काय माझा दास जाणून आहे की त्याचा निर्माणकर्ता आहे . जो गुन्हा माफ करणारा आहे आणि गुन्ह्याची शिक्षा सुध्दा देतो. मी आपल्या दासाला क्षमा केली. त्याने त्याच्या मना प्रमाणे करावे.''

(बुखारी, मुस्लिम)

७) माननीय अनस (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, मी जमिनीवरील लोकांवर त्यांच्या अपराधांपोटी एखाद्या वेळी कोप घडविण्याची इच्छा करतो, परंतु माझ्या घराला (मशिद) जे लोक आबादी आबाद ठेवतात (प्रार्थना करतात), तसेच मध्यरात्रीनंतर क्षमायाचना करतात. अशा लोकांकडे पाहून कोप घडविण्याची इच्छा सोडून देतो

आणि जमिनीवरील लोकांवर माझा कोप होऊ देत नाही.'' (बैहकी)

८) माननीय इब्न अब्बास (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाहने सदाचार आणि दुराचार लिहून ठेवला आहे आणि त्या सदाचाराला आणि दुराचाराला आपल्या ग्रंथातसुध्दा लिहून ठेवले आहे. एखाद्या माणसाने जर सदाचार करण्याचा दृढ निश्चय केला आणि त्या व्यक्तीच्या हातून तो सदाचार घडला नाही. तरी अल्लाह त्या माणसाच्या नावे एक सदाचार लिहून ठेवतो. संकल्प सोडल्यानंतर ते सत्कृत्य त्याने केले तर त्या माणसाच्या नावे दहा पुण्यांपासून ते ७०० (सातशे) पुण्य केल्याचे अथवा त्याहून जास्त पुण्य लिहून ठेवतो. याउलट जो कोणी वाईटाची इच्छा करतो. परंतु ते वाईट कृत्य तो करीत नाही तर त्या माणसाच्या नावे एक पुण्य लिहून ठेवले जाते. त्या माणसाने ते वाईट कृत्य जर केले तर त्याच्या नावे फक्त एक पाप केल्याची नोंद होते.''

(बुखारी, मुस्लिम)

९) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, एखादी व्यक्ती जेव्हा गुन्हा करण्याचा इरादा करते. तेव्हा अल्लाह दूतांना आदेश देतो, ''जोपर्यंत तो मनुष्य गुन्हा करत नाही तोपर्यंत त्याच्या इच्छेनुसार त्याच्या कर्मनोंदीत गुन्ह्याची नोंद करू नका. त्याने जर गुन्हा केला तर फक्त एका गुन्ह्याची नोंद करा. त्याने ईशभयाने आपला इरादा सोडून दिला तर त्याच्या कर्मनोंदवहीत एक पुण्य नोंद करून ठेवा. त्या माणसाने जर एखाद्या सदाचाराचा इरादा केला, परंतु त्याच्या हातून तो सदाचार घडला नाही. तरी त्याच्या नावे एक पुण्य लिहून ठेवा. त्या व्यक्तीने जर इच्छित सदाचार केला, परंतु त्याच्या हातून तो सदाचार घडला नाही. तरी त्याच्या नावे एक पुण्य लिहून ठेवा. त्या व्यक्तीने जर इच्छित सदाचार केला तर त्याच्या कर्मनोंद वहीत त्याच्या नावे दहा पुण्याईपासून ते ७०० पुण्याईपर्यंतची नोंद करून ठेवा.''

(बुखारी, मुस्लिम)

१०) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, ''जेव्हा माझा दास सदाचार करण्याचा मनात इरादा करतो, परंतु जोपर्यंत सदाचार करत नाही एक पुण्य मी त्याच्या कर्मनोंदवहीत लिहून ठेवतो. आणि जेव्हा तो मनुष्य सदाचार करतो तेव्हा मी त्याच्या पुण्याईत दहा पटीने वाढ करून लिहितो. एखादा दास आपल्या मनात कुकर्म करण्याचा विचार आणतो तर जोपर्यंत ती व्यक्ती तो गुन्हा (कुकर्म) करत नाही, मी त्याला क्षमा करतो. परंतु जेव्हा तो कुकर्म करतो तेव्हा एक गुनाह (पाप) त्याच्या नावे लिहितो. परंतु तो त्या कुकर्माला मनात आणून नंतर सोडून देतो, तर मी

त्याच्या नावे एक पुण्य लिहितो. कारण त्याने माझ्या भयामुळे ते कुकर्म केले नाही.''
(मुस्लिम)

११) माननीय अब्दुल्लाह इब्न उमर (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह प्रलयकाळात आपल्या श्रध्दावंत दासाला जवळ करीन आणि आपल्या कृपाछत्राखाली घेईन. आपल्या अपराधांना तो अल्लाहसमोर मान्य करील. अल्लाह विचारेल, ''तू काय काय गुन्हे केले आहे?'' दास उत्तर देईल, ''हे माझ्या प्रभु, मी हे गुन्हे केलेले आहेत.'' आणि तो विचार करील की आता त्याचा सर्वनाश होणार. अल्लाह म्हणेल, ''मी जगात तुझ्या दोषांवर पडदा टाकला, आजसुध्दा मी तुला मुक्ती देईन.'' नंतर त्याची कर्मनोंदवही त्याच्या उजव्या हातात दिली जाईल. धर्मद्रोही आणि दांभिक लोकांविषयी स्पष्ट केले जाईल की हे ते लोक आहेत जे अल्लाहाच्या नावे खोटे बोलले होते. जाणून असा हेच लोक अल्लाहच्या धिक्काराचे आणि कोपचे हकदार आहेत.''
(अहमद, बुखारी, मुस्लिम, नसई, इब्न माजा)

१२) माननीय अनस (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, जेव्हा एखादा दास म्हणतो, ''हे माझ्या प्रभु!'' अशा वेळी त्याने गुन्हा केलेला असतो. दूत म्हणतात, ''हा क्षमा करण्यायोग्य नाही.'' अल्लाह म्हणतो, ''माझ्यासाठी योग्य तर हेच आहे की मी त्याला माफ करावे.'' *(तिरमिजी)*

अल्लाहसाठीच मित्रता आणि अल्लाहसाठीच शत्रुत्व

१) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''कयामतच्या दिवशी अल्लाह म्हणेल की, कुठे आहेत ते लोक जे आपापसात माझ्या सामर्थ्यामुळे आणि प्रतिष्ठेमुळे प्रेमळ होते. आज मी त्यांना आपल्या छायेत ठेवीन. आज माझ्या छायेशिवाय इतर कोणतेच दुसरे छत्र नाही.''
(मुस्लिम, बुखारी, मालिक)

२) माननीय इरबाज बिन सारियह (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, माझ्या सामर्थ्य आणि प्रतिष्ठेपोटी आपापसात प्रेम करणारे माझे दास कयामतच्या काळात माझ्या राजसिंहासनाच्या छायेखाली असतील. त्या काळात माझ्या छायेशिवाय इतर दुसरी कोणतीही छाया असणार नाही.'' *(अहमद)*

३) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''जर एखादी व्यक्ती पश्चिमेला असेल आणि दुसरी पूर्वेला असेल आणि

दोघेही आपसाँत अल्लाहसाठीच प्रेम करीत असतील, तर अल्लाह या दोघांना कयामतच्या काळात एकत्र करील आणि प्रत्येकाला म्हणेल, ''ही आहे ती व्यक्ती ज्याला तू प्रेम करत होतास.'' *(बैहकी)*

४) माननीय मआज बिनजबल (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, माझ्या प्रेमाला पात्र तेच लोक आहेत जे माझ्यासाठी आपसात प्रेम करतात आणि माझ्यासाठीच एकत्र उठत बसत होते. (कार्यमग्न होते) माझ्याचसाठी एकमेकांना भेटत असत आणि माझ्याचसाठी एकमेकांवर आपली संपत्ती खर्च करीत होते.'' (मालिक)

५) माननीय अबु हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, ''अल्लाह आपल्या एखाद्या दासावर प्रेम करतो तेव्हा जिब्रईल (अ) यांना सांगतो, ''हे जिब्रईल, मी अमुक व्यक्तीशी प्रेम करतो, तुम्हीसुध्दा त्याच्याशी प्रेम करा.'' जिब्रईल (अ) त्याच्याशी प्रेम करू लागतात. जिब्रईल (अ) आकाशात घोषणा करतात की अल्लाह म्हणतो, ''मी अमुक व्यक्तीशी प्रेम करतो. हे आकाशवाल्यांनों! तुम्हीसुध्दा त्या दासाशी प्रेम करा.'' आकाशातील सर्वजण त्या दासावर प्रेम करू लागतात आणि पृथ्वीवर त्याची लोकप्रियता नंतर फैलावली जाते. अल्लाह एखाद्या दासावर अप्रसन्न होतो तेव्हा जिब्रईल (अ) यांना सांगतो, ''हे जिब्रईल, मी अमुक व्यक्तीचा धिक्कार करतो. मी त्याच्याशी शत्रुत्व ठेवून आहे. तुम्हीसुध्दा त्याच्याशी शत्रुत्व ठेवा.'' माननीय जिब्रईल (अ) त्या व्यक्तीशी शत्रुत्व ठेवतात आणि आकाशात घोषणा करतात, ''अमुक व्यक्तीशी अल्लाचे वैर आहे. हे आकाशवाल्यांनो! तुम्हीसुध्दा त्याच्याशी वैर ठेवा.'' प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले आहे, ''आकाशातलेसुध्दा त्याच्याशी वैर ठेवतात. पृथ्वीवर त्याच्याविषयीचा द्वेष आणि वैर फैलाविला जातो.'' *(मुस्लिम)*

संकटकाळात धैर्यशील राहाणे

१) माननीय अनस (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, मी आपल्या दासांच्या दोन अतिप्रिय वस्तू घेवून त्यांची परीक्षा घेतो. त्या वेळी तो दास धैर्याने काम घेतो व संयम सोडत नाही, तर त्या मोबदल्यात मी त्याला स्वर्ग बहाल करतो.'' *(बुखारी)*

२) माननीय अबू मुसा अशअरी (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''जेव्हा एखाद्या दासाचा मुलगा मृत पावतो तेव्हा अल्लाह दूतांना विचारतो, ''तुम्ही माझ्या दासाच्या मुलाचा जीव ताब्यात घेतला?''

दूत होकारार्थी उत्तर देतात. त्यावर अल्लाह म्हणतो, ''तुम्ही दासाच्या हृदयाचे फळ तोडून टाकले?'' दूत पुन्हा होकारार्थी उत्तर देतात. त्यावर अल्लाह म्हणतो, ''यावर माझ्या दासाची काय प्रतिक्रिया आहे?'' दूतांनी सांगितले, ''अशा दु:खासमयीसुध्दा तुझ्या दासाने तुझीच प्रशंसा केली आहे. 'अलहम्दुलिल्लाह' (सर्व प्रशंसा अल्लाहसाठीच आहे) म्हटले आणि 'इन्ना लिल्लाही व इन्ना इलैहि राजिऊन' (आम्ही अल्लाहचेच आहोत आणि आम्हाला अल्लाहकडेच परत जायचे आहे) म्हटले.'' अल्लाह म्हणतो, ''माझ्या या दासासाठी स्वर्गात एक घर बनवा आणि त्या घराचे नाव 'बैतुल हम्द' (स्तुती निवास) ठेवा.'' *(तिरमिजी, अहमद)*

३) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, माझ्या त्या दासासाठी माझ्याजवळ जन्नतपेक्षा कमी मोबदला नाही. मी या जगात त्याच्या घनिष्ठ मित्रांपैकी एकाला मृत्यु दिल्यावर तो दास त्यावर धैर्यशील राहतो.'' *(बुखारी)*

४) माननीय सहाद बिन औस (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, ''सर्वशक्तिमान अल्लाह म्हणतो की, मी आपल्या श्रध्दावंत दासांपैकी एका दासाला परीक्षेत टाकतो तेव्हा तो माझी प्रशंसा करतो. असा दास आपल्या अंथरूणातून अशा प्रकारे पवित्र उठतो जसा की त्याच्या आईने आताच त्याला जन्म दिला आहे.'' समृध्दशाली अल्लाह दूतांना सांगतो, ''मी आपल्या दासाला आजारपणापासून मुक्त केले आहे. तो ते कृत्य करणार नाही जे तो यापूर्वी करत होता. तुम्ही आता यापुढे त्या दासासाठी ते पुण्य लिहीत चला जे तुम्ही त्याच्या स्वास्थ्यपूर्व स्थितीत लिहीत होता.'' *(अहमद)*

आजारपणाची विचारपूस

१) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, ''अल्लाह प्रलयाच्या दिवशी एका दासाला म्हणेल, हे आदमपुत्र! मी आजारी पडलो तेव्हा तू माझी विचारपूस करण्यास आला नाही?'' तो दास म्हणेल, ''हे सृष्टी निर्माणकर्त्या, मी तुझी विचारपूस आजारपणाची कशी करणार? तू तर समस्त सृष्टीचा निर्माणकर्ता आहेस.'' अल्लाह यावर म्हणेल, ''तू जाणत नव्हता काय की अमुक अमुक माझा दास आजारी आहे? त्याच्याकडे तू आजारपणात विचारपूस करण्यास गेला नाही. तुला हे माहीत नव्हते काय की त्याच्याकडे जाऊन त्याच्या आजारपणाची तू विचारपूस केली असती तर मला तू अवश्य तिथे पाहिले असते.'' ''हे आदमपुत्र! मी उपासी होतो तेव्हा तुझ्याकडे मी जेवण मागितले परंतु

तू दिले नाहीस.'' दास म्हणेल, ''हे प्रभो, मी तुला खाऊ कसा घालेल, तू तर समस्त सृष्टीचा निर्माणकर्ता आणि पालनकर्ता आहेस.'' यावर अल्लाह म्हणेल, ''काय तुला माहीत नव्हते की अमुक अमुक माझा दास उपासी होता. त्याने तुझ्याकडे जेवण मागितले, परंतु तू त्याला जेवण (भाकरी) दिले नाहीस. तुला हे ठाऊक नव्हते काय की तू त्या उपासी माणसाला जेवू घातले असते तर त्या पुण्याईला माझ्याजवळ तू मिळविले असते.'' ''हे आदमपुत्र! मी तुझ्याकडे पाणी मागितले, परंतु तू मला पाणी दिले नाहीस.'' दास म्हणेल, ''मी तुला पाणी कसे पाजू शकेन, तू तर समस्त विश्वाचा पालनकर्ता आहेस.'' यावर अल्लाह म्हणेल, ''माझ्या अमुक अमुक दासाने तुझ्याकडे त्याची तहान भागविण्यासाठी पाणी मागितले होते, परंतु तू ते दिले नाही. तू जर त्याला पाणी देऊन त्याची तहान शमविली असती तर त्या मोबदल्यात माझ्याकडे तुला पुण्य मिळाले असते.'' *(मुस्लिम)*

२) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले आहे की जेव्हा एखादा मुस्लिम आपल्या आजारी भावाजवळ त्याची विचारपुस करण्यास जातो तेव्हा अल्लाह म्हणतो, ''तुझ्यासाठी शुभवार्ता आहे. तुझे हे कृत्य शुभ आहे. तू आपले घर स्वर्गामध्ये बनविले आहे.'' (तिरमिजी)

३) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) एका आजारी माणसाकडे त्याच्या आजारपणाची विचारपूस करण्यासाठी गेले. तो मनुष्य तापाने त्रस्त होता. प्रेषित मुहम्मद (स.) त्याला म्हणाले, ''तुझ्यासाठी शुभवार्ता आहे.'' अल्लाह म्हणतो, ''हा ज्वर (ताप) माझा अग्नी आहे. मी आपल्या श्रध्दावंत दासावर जगातच ती टाकतो जेणेकरून नरकाग्नीचा तो बदला ठरावा आणि प्रलयकाळात त्याला नरकाग्नीपासून अजिबात त्रास होऊ नये.''

(अहमद, इब्न माजा, बैहकी)

मुस्लिम समुदायाची महानता

१) माननीय इब्न उमर (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''तुमचा जीवनकाळ मागील समूहाच्या तुलनेत असा आहे की जणू संध्याकाळपासून (अस्रची वेळ) ते सूर्यास्तपर्यंतचा काळ. यहुदी आणि ख्रिस्ती लोकांच्या तुलनेत तुमचे उदाहरण असे आहे की एखाद्या व्यक्तीने काही मजुरांना कामावर लावले आणि विचारले, ''एक रुपयासाठी दुपारपर्यंत कोण काम करील?'' यहुदी लोकांनी एक रुपयासाठी दुपारपर्यंत काम केले. त्याने पुन्हा विचारले, ''आता संध्याकाळपर्यंत एक रुपयावर कोण काम करील?'' ख्रिस्ती लोकांनी दुपारपासून

ते संध्याकाळपर्यंत एक रूपयावर काम केले. त्या गृहस्थाने पुन्हा विचारले, ''आता कोण संध्याकाळपासून ते सूर्यास्तापर्यंत दोन रूपयांसाठी काम करील? ओळखून असा की ते लोक तुम्ही मुस्लिम लोक आहात ज्यांनी संध्याकाळपासून ते सूर्यास्तापर्यंत काम केले. लक्षात ठेवा तुमच्यासाठी दुप्पट मोबदला आहे.'' यावर यहुदी आणि ख्रिस्ती लोक रागावले आणि सांगितले, ''आमचे काम जास्त आहे आणि मजुरी कमी?'' यावर अल्लाह म्हणाला, ''तुमच्याशी मी अन्याय केला आहे काय? तुम्हाला कमी दिले काय?'' त्यांनी उत्तर नकारार्थी दिले. अल्लाह म्हणाला, ''ही तर माझी कृपा आहे. ज्याला मी इच्छितो त्याला तसे देतो.'' *(बुखारी)*

२) माननीय अबू मुसा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''मुस्लिम, यहुदी आणि ख्रिस्ती लोकांचे उदाहरण असे आहे– एखाद्याने काही लोकांना ठराविक मजुरीवर दिवसभर कामावर लावले. त्या लोकांनी दुपारपर्यंतच काम केले. ते लोक त्या व्यक्तीला म्हणू लागले, ''आम्हाला मजुरीची गरच नाही, जी मजुरी तू आमच्यासाठी निश्चित केली होतीस. आम्ही जे काम केले ते सर्व वाया गेले.'' त्या माणसाने सांगितले, ''असे करू नका. आपले राहिलेले काम पूर्ण करा आणि आपली ठरलेली मजुरी घेऊन जा.'' यहुदी लोकांनी नकार दिला आणि काम सोडून गेले. त्यांच्यानंतर त्या माणसाने दुसऱ्या लोकांना (ख्रिस्ती लोकांना) कामावर लावले आणि सांगितले, ''राहिलेला दिवसापर्यंत तुम्ही काम करा आणि मी त्यांच्यासाठी (यहुदी लोकांसाठी) जी मजुरी ठरविली होती ती तुम्हाला देऊन टाकीन.'' त्यांनी कामाला सुरवात केली. जेव्हा अस्रची वेळ (पूर्वसंध्या) झाली तेव्हा म्हणू लागले, ''आम्ही तुमचे जेवढे काम केले ते वाया गेले. आम्हाला तुझी मजुरीही नको आणि कामसुध्दा नको. आम्ही हे काम सोडून चाललो.'' त्या माणसाने विनंती केली, ''तुम्ही राहिलेले काम पूर्ण करा. आता तर फार थोडा वेळ राहिला आहे.'' त्यांनी नकार दिला. नंतर त्या माणसाने दुसऱ्या लोकांना (मुस्लिमांना) कामावर लावले जेणेकरून त्यांनी राहिलेल्या वेळेत काम पूर्ण करावे. त्यांनी काम पूर्ण केले आणि दोघांची ठरलेली मजुरी पूर्ण घेतली. हे उदाहरण आहे नकार देणाऱ्यांचे आणि त्यांचे ज्यांनी प्रकाशाचा स्वीकार केला.''

(बुखारी)

प्रेषित मुहम्मद (स.) यांचे साथीदार (सहाबा)

१) माननीय बुरीदा (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, ''अल्लाहने मला चार माणसावर प्रेम करण्याचा आदेश दिला आहे. (म्हणजे अल्लाहने ज्यांच्याशी मला प्रेम करण्याचा आदेश दिला त्यापैकी हे

चार लोक आहेत) कारण अल्लाहसुध्दा या चार लोकांशी प्रेम करतो. कोणीतरी प्रेषितांना त्यांचे नाव विचारले. त्यांनी सांगितले, त्या चारपैकी एकजण माननीय अली (र) हे आहेत. नंतर सांगितले, अबू जर, मिक्दाद आणि सलमान (र). अल्लाहने यांच्याशी मला प्रेम करण्याचा आदेश दिला आणि मला सांगितले, ''हे चारजण अल्लाहलासुध्दा प्रिय आहेत.'' *(तिरमिजी)*

२) माननीय अनस बिन मालिक (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स) यांनी बैय बिन काब (र) यांना सांगितले, ''अल्लाहने मला आदेश दिला आहे की, तुम्हाला कुरआन पठण करून दाखवावे.'' त्यांनी विचारले, ''अल्लाहने माझे नाव घेऊन विचारले काय?'' प्रेषितांनी होकारार्थी उत्तर दिले, ''तुमचे नाव घेऊन मला आदेश दिला.'' हे ऐकून बैय बिन काब (र) रडू लागले. *(मुस्लिम)*

कुरआन पठण करण्याचे महत्त्व

१) माननीय अबू सईद खुदरी (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, ''समृध्दशाली सृष्टीनिर्माता अल्लाह म्हणतो, ''ज्याला कुरआनने कार्यमग्न ठेवले आणि त्याला माझे स्मरण करण्याची आठवणसुध्दा झाली नाही आणि माझ्याशी याचना करण्याची सवड सुध्दा मिळाली नाही. मी त्याला मागणाऱ्यापेक्षासुध्दा जास्त प्रमाणात देतो.'' दुसऱ्या ग्रंथापेक्षा अल्लाहच्या ग्रंथाची श्रेष्ठता अशी आहे ज्याप्रमाणे अल्लाहचे श्रेष्ठत्व त्याच्या निर्मितीवर आहे.''
(तिरमिजी, बैहकी)

२) माननीय अब्दुल्लाह बिन अम्र बिन आस (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, ''कयामतच्या दिवशी कुरआनवाल्या व्यक्तीला सांगितले जाईल की कुरआन पठण चालू ठेवावे. विचार करून पठण करावे जसे जगात चिंतन मनन करून कुरआन पठण करत होता. तुमची स्थाननिश्चिती तुमच्या कुरआन पठणातील शेवटच्या आयतीनुसार ठरेल.'' *(तिरमिजी, अबु दावूद)*

नमाज

१) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, ''तुमच्यामध्ये रात्रीचे आणि दिवसाचे नियुक्त दूत मागे पुढे येत–जात राहतात. यांचा मिलाप फर्ज नमाज (सकाळच्या वेळची) आणि असर नमाज वेळी (संध्याकाळची नमाज) होतो. जे दूत रात्री तुमच्याबरोबर राहतात ते सर्व आकाशाकडे

जातात. अल्लाह त्यांना विचारतो, ''तुम्ही माझ्या दासांना कोणत्या स्थितीत सोडून आलात?'' ते उत्तर देतात, ''जेव्हा आम्ही त्यांच्याजवळ गेलो तेव्हा ते नमाज अदा करीत होते आणि जेव्हा त्यांना सोडून आलो तेव्हासुध्दा ते नमाज अदा करीत होते.'' *(बुखारी, मुस्लिम)*

२) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, ''प्रलयाच्या दिवशी सर्वप्रथम दासाजवळ नमाजबद्दलचा हिशेब घेतला जाईल. नमाज सुव्यवस्थित असेल तर तो सफल ठरेल आणि सुटका प्राप्त करील. जर नमाज दोषपूर्ण ठरली तर तो दास असफल ठरला आणि नुकसानीत गेला. अनिवार्य (फर्ज) नमाज दोषपूर्ण ठरली तर सर्वशक्तिमान अल्लाह म्हणेल, ''पाहा माझ्या दासाजवळ काही नफील (गौण) नमाज आहेत का? जर असतील तर अनिवार्य नमाजांची कमतरता नफील नमाजाद्वारा भरून काढली जाईल. नंतर त्याच्या सर्व कर्मांसोबत हाच व्यवहार केला जाईल.''

(तिरमिजी, अबु दाऊद, नसई)

३) माननीय उक्बा बिन आमीर (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले की सृष्टीनिर्मात्याला पर्वतशिखरवार शेळ्या-मेंढ्या चारणारा आवडतो, कारण तो अजान देतो आणि नमाज अदा करतो अल्लाह म्हणतो, ''माझ्या या दासाला पाहा, तो अजान देतो आणि नमाज प्रस्थापित करतो आणि माझे भय बाळगतो. मी आपल्या दासाला मुक्ती दिली आणि त्याला जन्नतमध्ये दाखल केले आहे.'' *(नसई)*

४) माननीय अब्दुर्रहमान बिन आईश आणि इब्न अब्बास, मुआज बिन जबल (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, ''मी सर्वशक्तिमान अल्लाहला स्वप्नात अत्यंत लोभस रूपात पाहिले. अल्लाह म्हणाला, ''हे मुहम्मद! उंच दरबारवाले दूत कशासाठी भांडत होते हे तू जाणतो काय?'' मी सांगितले, ते गुन्ह्यांना दूर करणाऱ्या गोष्टींसाठी भांडत आहेत. गुन्ह्यांना दूर करणाऱ्या वस्तू म्हणजे मशिदीत नमाजनंतर थांबून राहणे आणि जमातसाठी चालत जाणे आणि अशक्य स्थितीत पूर्ण वजू करणे. ज्याने हे केले तो चांगुलपणात जगला आणि मृत्यु पावला तोसुध्दा चांगुलपणानेच. तो आताच जन्मलेल्या बाळाप्रमाणे पवित्र आहे. अल्लाह म्हणाला, ''हे मुहम्मद! जेव्हा तुम्ही नमाज पूर्ण केली तर ही प्रार्थना करा– हे अल्लाह मी तुझ्याजवळ मागतो चांगले कर्म आणि वाईटकर्माचा त्याग. मी असहाय लोकांशी प्रेम करावे. तू तुझ्या दासांना उपद्रवात टाकण्याचा निश्चय करशील तेव्हा मला तुझ्याजवळ बोलावून घे, अशा स्थितीत की मी

उपद्रवग्रस्त नसेन.'' अल्लाह म्हणतो, ''श्रेष्ठ दर्जाचे आचरण सलामची प्रथा वाढविणे, जेवण देणे, रात्री नमाज अदा करणे जेव्हा लोक झोपेत असतात.'' *(मसाबीह)*

५) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, ज्याने माझ्या प्रिय दासाबरोबर शत्रुत्व केले अशा व्यक्तीविरुध्द युध्दाची घोषणा माझ्यातर्फे आहे. माझा दास इतर कोणत्याच कृत्याद्वारे माझ्याशी जवळीक प्राप्त करू शकत नाही. जशी जवळीक तो अनिवार्य (फर्ज) कृत्यांद्वारे प्राप्त करतो. माझा दास साधारण कृत्यांद्वारा माझ्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करत राहतो. अशा स्थितीत मी त्याच्यावर प्रेम करू लागतो. जेव्हा मी त्याच्यावर प्रेम करू लागतो तेव्हा मी त्याचा कान बनतो ज्याने तो ऐकतो, त्याचा डोळा बनतो ज्याद्वारे तो पाहतो. मी त्याचा हाथ बनतो ज्याद्वारा तो काम करतो आणि त्याचा पाय बनतो ज्याद्वारा तो चालतो. जर तो माझ्याजवळ काही मागतो तेव्हा मी त्याला अवश्य देतो. तो माझ्या आश्रयाला येऊ इच्छितो तेव्हा मी त्याला माझा आश्रय बहाल करतो. मला कोणतेच काम करण्यास संकोच वाटत नाही. परंतु श्रध्दावंत दासाचा प्राण हरण करताना संकोच वाटतो. तो मृत्युला नापसंत करतो. मला आवडत नाही की त्याला त्रास द्यावा आणि मृत्यू त्याच्यासाठी अटळ आहे.'' *(बुखारी)*

६) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो, 'नमाज माझ्या आणि माझ्या दासामध्ये निम्मा हिस्सा आहे. अर्धी नमाज माझ्यासाठी आहे आणि अर्धी नमाज दासासाठी आहे आणि माझ्या दासाला तेच प्राप्त होईल जे तो मागतो.' जेव्हा दास म्हणतो, 'सर्व प्रशंसा अल्लाहसाठी आहे जो सर्व सृष्टीचा निर्माणकर्ता, पालनहार, शासक आणि मालक आहे.' तेव्हा अल्लाह म्हणतो, 'माझ्या दासाने माझी प्रशंसा केली आणि कृतज्ञता व्यक्त केली.' जेव्हा दास म्हणतो, 'जो कृपाशील आणि दयावान आहे.' तेव्हा अल्लाह म्हणतो, 'माझ्या दासाने माझी स्तुती केली आहे. आणि जेव्हा दास म्हणतो की अंतिम दिवसाचा स्वामी आहे आणि निर्णयाच्या दिवसाचा स्वामी आहे. तेव्हा अल्लाह म्हणतो, 'माझ्या दासाने माझी महानता आणि श्रेष्ठत्व वर्णन केले.' आता जेव्हा तो म्हणतो, 'आम्ही तुझीच भक्ती करतो आणि तुझीच याचना करतो.' तेव्हा अल्लाह म्हणतो, 'माझा दास आणि माझ्यादरम्यान हा संबंध आहे. आणि त्याने जे मागितले ते त्याला मिळेल.' जेव्हा दास म्हणतो, 'मला सरळ मार्ग दाखव त्या लोकांचा मार्ग जे तुझ्या कृपेला पात्र ठरलेत. आणि जे कोपग्रस्त झाले नाहीत की मार्गभ्रष्ट झाले नाहीत.' यावर अल्लाह म्हणतो, 'हे माझ्या दासासाठी आहे आणि माझ्या दासाला

ते प्राप्त होईल ज्याची याचना त्याने केली आहे.''

(मुस्लिम, अबू दावूद, तिरमिजी)

(७) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, हे आदमपुत्र! तू माझ्या उपासनेसाठी सवड काढ, मी तुझ्या हृदयाला निडर बनवीन. तुझ्या असहायतेला नष्ट करीन. नाहीतर तुझ्या हाताना संतत काम देईन आणि तुला मोहताजीपासून मुक्त करणार नाही.''

(तिरमिजी, बैहकी)

(८) माननीय अबू दरदा (र) आणि अबू ज़र (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, हे आदमपुत्र! माझ्यासाठी प्रातःकाळी चार रकात नमाज अदा कर, तर मी दिवसाच्या अंतापर्यंत तुझ्या सर्व गरजा पूर्ण करीन.'' *(तिरमिजी, अबू दावूद, अहमद)*

रोजा (उपवास) आणि ईद

१) माननीय जाबिर बिन अब्दुल्ला (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, रोजा एक ढाल आहे. त्या ढालीमुळे दासाचा जहन्नमपासून बचाव होतो. रोजा माझ्यासाठी आहे आणि त्याचा मोबदला मी देणार.''

(अहमद बैहकी)

२) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, दासांपैकी तो दास मला सर्वाधिक प्रिय आहे जो रोजा सोडण्यासाठी घाई करतो.'' *(अहमद, तिरमिजी)*

३) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, रोजा माझ्यासाठी आहे आणि मीच त्याचा मोबदला देणार. दास आपली कामवासना आणि खाणे–पिणे माझ्यासाठी त्यागतो. रोजा एक ढाल आहे आणि रोजादारसाठी दोन शुभवार्ता आहेत. एक खुशी तर त्याला रोजा सोडतांना होते आणि दुसरी खुशी त्याला आपल्या प्रभुशी भेटताना होईल. रोजादारच्या मुखातील वास अल्लाहजवळ श्रेष्ठतम सुगंधापेक्षासुद्धा उत्तम आहे.''

(बुखारी, मुसस्लिम, तिरमिजी, इब्ने माजा)

४) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, ''आदमपुत्राचे प्रत्येक कार्यासाठी दहापटीपासून ते सातशेपटीपर्यंत पुण्य वाढते. अल्लाह म्हणतो की, रोजाची गोष्ट वेगळी आहे, कारण रोजा माझ्यासाठी आहे आणि मी त्याचा मोबदला देईल. दास आपली कामवासना, खाणे–पिणे

माझ्यासाठी सोडतो. रोजेदारासाठी दोन आनंदाचे क्षण आहेत. एक आनंदाचा क्षण रोजा सोडतांना असतो तर दुसरा आनंदाचा क्षण आपल्या निर्माणकर्त्याला भेटताना होईल. रोजादारच्या मुखातील वास अल्लाहजवळ श्रेष्ठतम सुगंधीपेक्षासुध्दा उत्तम आहे. म्हणून तुम्हापैकी कोणी रोजादार असेल तर त्याने वाईट बोलू नये आणि भांडू नये. जर कोणी शिवीगाळ केली अथवा भांडण केले तर सांगून टाका की मी रोजादार आहे.'' *(बुखारी, मुस्लिम)*

५) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, ''तीन लोक असे आहेत ज्याची प्रार्थना रद्द केली जात नाही. एक रोजादार जेव्हा तो रोजा सोडतो. दुसरा मनुष्य न्यायनिष्ठ शासक आणि तिसरा मनुष्य ज्याच्यावर अत्याचार झालेला आहे. त्याच्या प्रार्थनेला अल्लाह आकाशावर उचलून घेतो आणि आकाशाचे द्वार अत्याचारपीडितासाठी उघडे ठेवतो आणि म्हणतो की, मला माझ्या प्रतिष्ठेची शपथ, मी तुझी (पीडित व्यक्तीची) मदत करणार त्यास काही काळ लागला तरी माझी मदत येणारच.'' (तिरमिजी)

६) माननीय अनस (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, ''लैलतुल कद्र (रमजानची एक शुभरात्र), या रात्री आदरणीय जिब्रईल (अ) दूतांच्या एका समूहासमवेत उतरतात आणि जे दास अल्लाहच्या उपासनेत मग्न असतात. मग ते उभे राहून अथवा बसून उपासना करत असतील, त्या सर्वांसाठी कृपावर्षाव होण्यासाठी सर्व दूत प्रार्थना करतात. जेव्हा त्यांचा ईदचा दिवस येतो. (ईदुलफित्र) तो त्यांचा रोजा समाप्तीचा दिवस असतो. त्यावेळी अल्लाह आपल्या दासांच्या कार्यावर गर्व करतो आणि दूतांना म्हणतो, 'हे माझ्या दूतांनो! जेव्हा एखादा मजूर आपले काम पूर्ण करतो तर त्याचा मोबदला काय असतो?' ते सर्वजण म्हणतात, हे 'आमच्या पालनकर्त्या! त्या मजुराचा मोबदला हा आहे की त्याची पूर्ण मजुरी दिली जावी.' अल्लाह म्हणतो, 'माझे दूत, माझे दास आणि दासींनी माझे कर्तव्य जे त्यांच्यासाठी अनिवार्य होते अदा केले आहे. आणि त्यांनी प्रार्थना केली आहे. मला माझ्या प्रतिष्ठेची, श्रेष्ठत्वाची, उदारतेची आणि कृपाशीलतेची शपथ! निश्चितच मी त्यांच्या प्रार्थनेला कबूल करीन.' नंतर अल्लाह त्यांना आदेश देतो, 'तुम्ही आपापल्या घरी परत जा. मी तुम्हा सर्वांची मुक्ती केली आहे आणि तुमच्या वाईटांना मी चांगुलपणात परिवर्तीत केले आहे.'' प्रेषित मुहम्मद (स.) म्हणतात, ''ते अशा स्थितीत माघारी फिरतात की त्यांना मुक्ती प्राप्त झाली आहे.''

(बैहकी)

दान धर्म (सदका)

१) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, हे आदमपुत्र! तू अल्लाहच्या मार्गात आपली संपत्ती खर्च करत राहा, मी तुझ्यावर खर्च करील.'' *(बुखारी, मुस्लिम)*

२) माननीय अबू मसऊद अन्सारी (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''तुमच्या पूर्वजांपैकी एक मनुष्य असा होता ज्याने सदाचार केला नव्हता. तो लोकांशी व्यवहार करत होता. तो श्रीमंत होता. तो आपल्या गुलामांना सांगत असे, गरजूंची मदत करत जा आणि त्यांना क्षमा करीत जा. अल्लाह म्हणतो, 'मला तुझ्यापेक्षा जास्त क्षमाशीलता आहे.' अल्लाहने दूतांना आदेश दिला की त्या व्यक्तीला क्षमा करा.'' *(बुखारी, मुस्लिम, नसई)*

३) माननीय अबी बिन हातीम (र) यांचे निवेदन आहे, मी अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांच्या सोबत होतो. तिथे दोन माणसे आली. त्यातील एक आपल्या गरीबीचा आणि हालअपेष्टांचा वृत्तान्त प्रेषितांना देत होता तर दुसरा रस्त्यातील लूटमारीबद्दल तक्रार करीत होता. प्रेषितांनी सांगितले, ''रस्त्यातील लूटमारीचा प्रश्न काही काळापुरताच आहे, एक दिवस येईल की एक काफिला विना संरक्षकासह मक्का शहरापर्यंत प्रवास करील. हालअपेष्टा आणि गरीबीचा प्रश्न आहे, कयामत तोपर्यंत होणार नाही जोपर्यंत एक व्यक्ती दान करण्यासाठी बाहेर पडेल, परंतु दान घेणारा एकजणसुध्दा सापडणार नाही. कयामतच्या दिवशी तुमच्यातील एक मनुष्य अल्लाहसमोर उभा राहील. अल्लाह आणि त्याच्यात काही पडदा राहणार नाही आणि दुसरा कोणी प्रवक्ता राहणार नाही. अल्लाह त्या माणसाला विचारेल, 'मी तुला संपत्ती दिली नव्हती काय?' तो म्हणेल, 'संपत्ती दिली होती.' नंतर अल्लाह त्याला विचारेल, 'तुझ्याजवळ प्रेषित आला नव्हता काय?' तो म्हणेल, 'आमच्याकडे तू प्रेषित पाठविला होता.' तो मनुष्य आपल्या डावीकडे पाहील तर त्याला अग्नीडोंब दिसेल. म्हणून तुमच्यापैकी प्रत्येकाने अग्नीपासून आपला बचाव करावा, मग एक खजुरीचा तुकडा दान करून का होईना. जर हे त्याला प्राप्त झाले नाही तर चांगले बोलून त्याने कार्य करावे.'' *(बुखारी)*

हजयात्रा

१) माननीय अबू सईद खुदरी (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, ''सर्वशक्तिमान अल्लाह म्हणतो की, मी माझ्या दासाला शारीरिक स्वास्थ्य दिले आणि विपुल उपजीविकासुध्दा दिली आणि त्यानंतर पाच वर्षांचा

काळ संपून गेला, तरी माझा दास माझ्याकडे (हजयात्रेसाठी) आलाच नाही, तर तो दुर्दैवी आहे.'' *(बैहकी)*

२) माननीय माता आयशा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, '''अरफह'च्या दिवशी (जिलहज्ज महिन्याचा नववा दिवस) अल्लाह सर्वांत जास्त लोकांना जहन्नमपासून मुक्त करतो. या दिवशी अल्लाह आपल्या दासांच्या अगदी जवळ येतो आणि आपल्या दूतांना गर्वपूर्वक म्हणतो की, या लोकांची इच्छा काय आहे?'' *(मुस्लिम)*

३) माननीय ज़ाबिर (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, ''जेव्हा 'अरफह'चा दिवस येतो तेव्हा अल्लाह आकाशाकडे येतो आणि दूतांपुढे हजयात्री लोकांबद्दल गौरवपूर्ण उल्लेख करून म्हणतो 'पाहा माझ्या दासांकडे! ते लांब अंतरावरून येथे येतात. प्रवासामुळे त्यांचे केस विस्कटलेले आहेत, धुळीने माखलेले आहेत आणि मला पुकारीत आहेत. मी तुम्हाला यावर साक्षीदार बनवत आहे की मी त्यांना मुक्ती दिली आहे.' यावर दूत म्हणाले, 'हे निर्माणकर्त्या प्रभु! अमुक व्यक्ती तर गुन्हेगार आहे आणि अमुक स्त्री व अमुक पुरुष गुन्हेगार आहेत.' अल्लाह म्हणतो की, मी तर यांना मुक्ती दिली आहे.'' अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, '''अरफह'सारखा असा कोणताच दिवस नाही ज्यात सर्वांत जास्त लोक जहन्नमच्या मुक्तीला प्राप्त करतात.''

(शरहुस्स सुन्नह)

जिहाद (संघर्ष)

१) माननीय इब्न उमर (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले.'' अल्लाह म्हणतो की, माझ्या दासातून जो दास अल्लाहच्या मार्गात प्रयत्नांची पराकाष्ठा (जिहाद) करण्याचा उद्देशाने बाहेर पडतो, मी त्याच्यासाठी दोन गोष्टींबद्दल स्वत:कडे जबाबदारी घेतो. त्याला जर परत आणले तर पुण्य आणि मोबदल्यासह परत आणले जाईल. तो 'गनीमत' (युध्दात हस्तगत केलेला माल) च्या संपत्तीचा मालकसुध्दा असेल. जर त्याला मृत्यु आला तर त्याला मुक्ती प्रदान केली जाईल आणि त्याच्यावर दयेचा वर्षाव केला जाईल.'' *(नसई)*

२) माननीय अनस बिन मालिक (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''एक व्यक्ती जन्नतमधून आणला जाईल. अल्लाह त्याला म्हणेल, 'हे आदमपुत्र! तुला प्राप्त झालेले स्थान कसे आहे?' तो म्हणेल, 'हे अल्लाह, अत्यंत चांगले स्थान आहे.' अल्लाह म्हणेल, 'माग तुला काय हवे ते?'

तो म्हणेल, 'माझी मागणी आहे की मला जगात पुन्हा पाठव जेणेकरून मी तुझ्या मार्गात दहा वेळा मारला जावा.' हे उद्‌गार तो शहीद होण्याच्या मोबदल्याचा आणि श्रेष्ठत्वाचा अनुभव घेतल्यानंतर म्हणेल.'' *(नसई)*

३) माननीय मसरूक (र) यांचे निवेदन आहे, मी माननीय अब्दुल्लाह इब्न मसऊद यांच्याकडून कुरआनोक्ती ''जे लोक अल्लाहच्या मार्गात मारले गेलेत त्यांना मृत समजू नका. ते तर जीवंत आहेत आणि आपल्या पालनकर्त्याकडून ते उपजीविका प्राप्त करीत आहेत.'' ह्याचा खुलासा विचारला. त्यांनी सांगितले, आम्ही याचा खुलासा अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांना विचारला होता. तेव्हा ते म्हणाले होते, शहीद लोकांचे आत्मे हिरव्या रंगाच्या चिमण्याच्या रूपात असतात. त्यांच्यासाठी आकाशात लटकलेले कंदील आहेत. हे पुण्यात्मा जन्नतमध्ये त्यांना जिथे हवे तिथे फिरतात आणि शेवटी या कंदीलात पुन्हा येऊन स्थिरावतात. त्यांचा पालनकर्ता त्यांना म्हणतो, ''तुमची काय इच्छा आहे?'' ते शहीद म्हणतात, ''आम्हाला कशाचीच इच्छा नाही, कारण आम्हाला जन्नतप्राप्ती झाली आहे आणि जन्नतमध्ये आम्ही जिथे पाहिजे तिथे जातो. (आम्हाला जन्नतमध्ये पूर्ण स्वातंत्र आहे.)'' अल्लाह त्यांच्याशी तीनदा हाच प्रश्न विचारतो. जेव्हा त्यांना कळून चुकते की एकच प्रश्न पुन्हा पुन्हा विचारला जात आहे. तर ते म्हणतात, ''हे आमच्या पालनकर्त्या प्रभु, आम्हाला वाटते की आमचे आत्मे आमच्या शरीरात पुन्हा संचारित कर, जेणेकरून आम्ही तुझ्या मार्गात दुसऱ्यांदा शहीद केले जावे.'' अल्लाहची खात्री पटते की त्यांना कोणत्याच गोष्टीची अपेक्षा नाही तर त्यांना सोडून दिले जाते.

(मुस्लिम)

४) माननीय अब्दुल्लाह बिन मसअूद (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, ''तुमचा पालनकर्ता प्रभु दोन मनुष्यांवर फार खूश होतो. एक तर तो मनुष्य जो आपल्या मृदु अंथरूणावरून आपल्या प्रिय पत्नीपासून दूर होऊन नमाजसाठी उठतो. त्या वेळी अल्लाह आपल्या दूतांना म्हणतो, ''माझ्या या दासाला पाहा, जो जन्नत (स्वर्ग) च्या प्राप्तीसाठी आणि जहन्नमच्या भीतीने आपले नरम मृदु अंथरून सोडतो, आपल्या प्रिय पत्नीपासून दूर होतो आणि नमाज अदा करण्यासाठी (अपरात्री) उठून बसतो.'' दुसरा मनुष्य तो आहे ज्याने अल्लाहच्या मार्गात प्रयत्नांची पराकाष्टा (जिहाद) केली आणि आपल्या साथीदारांसह शत्रूला घाबरून मैदानातून पळ काढला. नंतर त्याने विचार केला की पळून जाण्यात किती पाप आहे आणि लढण्यात किती पुण्य आहे. म्हणून तो परत फिरला आणि शत्रुशी मुकाबला करीत राहिला. शेवटी लढत लढत तो शहीद झाला. हे पाहिल्यानंतर

अल्लाह आपल्या दूतांना म्हणतो, ''माझ्या या दासाला पाहा, जो माझ्याजवळील सामग्रीसाठी (स्वर्गप्राप्तीसाठी) आणि माझ्याजवळील सामग्रीच्या (नरकाग्नी) भीतीने लढाईच्या मैदानात परत आला आणि आपला जीव अर्पण करेपर्यंत लढत राहिला.''
(शरहुस्स सुन्नाह)

लोकांचा सहवास

१) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''तीन लोक असे आहेत ज्यांच्याशी अल्लाह बोलणार नाही की कृपादृष्टीसुध्दा करणार नाही. एक ती व्यक्ती ज्याने घेणाऱ्यासमोर आपल्या मालाविषयी खोटी शपथ खाऊन जास्त किंमतीला त्याला विकला. दुसरी ती व्यक्ती जो असरच्या नमाजनंतर (संध्याप्रहरी) खोटी शपथ यासाठी घेतो की एखाद्या मुस्लिमाचा माल हडप करावा. तिसरा तो मनुष्य जो आपल्या गरजेपेक्षा जास्त पाणी साठवून ठेवतो. अल्लाह म्हणेल, ''ज्याप्रमाणे तुम्ही गरज नसताना पाण्याची साठवण केली ते पाणी मी निर्मितो. आज मी त्याप्रमाणे आपली कृपादृष्टी तुझ्यासाठी रोखून धरली.'' *(बुखारी)*

२) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, तीन माणसे अशी आहेत ज्यांच्याशी मी कयामतच्या दिवशी भांडण करील. एक तो माणूस ज्याने माझी शपथ घेऊन वायदा केला आणि नंतर त्याला तोडले. दुसरा तो माणूस ज्याने एखाद्या स्वतंत्र व्यक्तीला विकून ते पैसे खाल्ले आणि तिसरा तो माणूस ज्याने एखाद्या मजुराला मजुरीवर लावले आणि त्याच्याकडून पूर्ण काम करून घेतले, परंतु त्याला त्याची मजुरी दिली नाही.''
(बुखारी, इब्न माजा, अहमद)

३) माननीय अब्दुर्रहमान बिन औफ (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, मी अल्लाह आहे आणि मी दयाळू आहे. मी नातेसंबंध निर्माण केले आणि माझ्या नावाच्या सहाय्याने त्यांची नावे ठेवलीत. म्हणून ज्यांनी नातेसंबंध जोडले, मी त्यांना जोडेन आणि ज्यांनी नातेसंबंध तोडले मी त्यांना विच्छिन्न करून टाकीन.'' *(अबू दाऊद)*

४) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''एका माणसाने वाईट कृत्य केले. तो मनुष्य लोकांना कर्ज देत होता. जेव्हा तो आपल्या नोकराला तगाद्यासाठी पाठवित असे, तेव्हा त्याला बजावून सांगत असे की 'सहज जेवढे मिळाले तेव्हढेच घे व जबरदस्ती करू नको, माफ

कर. शक्य आहे की अल्लाह आम्हालासुध्दा माफ करील.' जेव्हा त्या माणसाचा देहान्त झाला तेव्हा अल्लाह म्हणाला की, तू एखादी नेकी केली आहेस काय? त्याने नकारार्थी उत्तर दिले आणि सांगितले 'मी माझ्या नोकराला तगाद्यासाठी पाठवित तेव्हा त्याला बजावित होतो की सहज कर्ज वसूली झाली तर कर अन्यथा कर्ज माफ कर परंतु जबरदस्ती करू नकोस. तंगीच्या ठिकाणी माफ करीत जा. शक्य आहे अल्लाह आपल्याला माफ करील.' यावर अल्लाह म्हणाला की, मी तुला माफ केले.'' *(नसई)*

ज्ञानाचे महत्व

माननीय माता आयशा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाहने माझ्यावर हे दिव्य अवतरण केले आहे की, जो कोणी सत्य ज्ञानाच्या शोधात बाहेर पडला मी त्याच्यासाठी जन्नतचा मार्ग सुगम बनविल आणि ज्यांचे मी दोन डोळे घेतले (तो आंधळा बनला) तर त्या डोळ्यांऐवजी मी त्याला जन्नत बहाल करील. ज्ञानाचे अधिक्य उपासनेच्या अधिक्यापेक्षा श्रेष्ठ आहे. दीन (जीवन प्रणाली) चे मूळतत्त्व तर आज्ञाधारकता आहे.'' *(बैहकी)*

सदाचाराचा आदेश देणे

माननीय ज़ाबीर (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाहने जिब्रईल (अ) यांना दिव्य प्रकटन केले, 'अमुक वस्तीला त्यातील रहिवाशांसह उलटून टाका.' जिब्रईल (अ) म्हणाले की, हे प्रभो, त्या रहिवाशांत तुझा एक दास असासुध्दा आहे ज्याने एकदाही तुझी अवज्ञा केली नाही.' यावर अल्लाह म्हणतो की, त्या नगराला त्या दासावर आणि इतर सर्व रहिवाशांवर उलटून टाका, कारण त्या दासाला लोकांचा दुराचार पाहून एकदासुध्दा चिंता वाटली नाही आणि तो चिंताग्रस्त झाला नाही.'' *(बैहकी)*

सुशीलता

१) माननीय ऊबैदा बिन साबित (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, अल्लाह म्हणतो की, ''माझे प्रेम त्या लोकांसाठी उपयुक्त आहे जे माझ्या मार्गात राहून एकमेकांशी प्रेम करतात, माझ्या मार्गात राहून एकमेकांशी नातेसंबंध जोडतात, माझ्या प्रसन्नतेसाठी एकमेकांचे हितचिंतक आहेत, माझ्या मार्गात एकमेकांना भेटतात आणि माझ्या मार्गात राहून एकमेकांवर खर्च करतात. माझ्या मार्गात एकमेकांवर प्रेम करणारे प्रलयकाळात प्रकाशमान चबुतऱ्यावर

बसलेले असतील आणि प्रेषित व सत्यवान लोक त्यांच्या पदांची प्रशंसा करतील.'' *(अहमद)*

२) माननीय मुआज बिन जबल (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले आहे की अल्लाह म्हणतो, ''माझे प्रेम त्या लोकांसाठी अनिवार्य ठरले जे माझ्या मार्गात राहून एकमेकांवर प्रेम करतात, एकमेकांबरोबर बसतात, परस्परांशी भेटतात आणि माझ्या मार्गात एकमेकांवर खर्च करीत राहतात.'' *(मुवत्ता)*

३) माननीय सद्दाद बिन औस (र) यांचे निवेदन आहे की अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले आहे की अल्लाहने आदेश दिला आहे, ''प्रत्येकाशी सुशीलतेने वागा आणि सदाचाराने वागा. तुम्हाला कुणाला ठार करावयाचे असेल तरी सुशीलतेने आणि सदाचाराने ठार करा आणि जनावरांना कापतांना (जुबह) चांगल्या पध्दतीने जुबह करा. प्रत्येकाने जुबह करताना सुरी चांगलीच धारदार करून घेतली पाहिजे आणि जनावराला आराम दिला पाहिजे.'' *(मुस्लिम)*

४) माननीय अब्दुल्लाह बिन मसऊद (र) यांचे निवेदन आहे की प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले आहे, ''अल्लाह म्हणतो, कटाक्ष (नजर) सैतानाच्या बाणांपैकी एक विषारी बाण आहे, ज्याला माझ्या भीतीपोटी त्याने त्यागून दिले आहे. (परस्त्रीवर नजर टाकत नाही.) मी त्याच्या श्रध्देत अशा गुणांची वाढ करीन की त्यांची मधुरता आणि सुंदरता तो आपल्या मनात उपभोगेल.'' *(तबरानी)*

आपल्या जीवाचा हक्क

माननीय जुन्दुब बिन अब्दुल्लाह (र) यांचे निवेदन आहे की अल्लाहचे प्रेषित (स) यांनी सांगितले, ''तुमच्या पूर्वजात एक मनुष्य मोठ्या त्रासात खितपत पडला होता. त्याने त्रासात असंयमाने काम घेतले आणि सुरीने आपल्या हाताला कापून टाकले. रक्त प्रवाह थांबता थांबेना शेवटी तो मेला. अल्लाह म्हणाला की, माझ्या दासाने आपल्या जीवाशी घाई केली म्हणून मी जन्नत त्याच्यासाठी अवैध ठरविले आहे. (तो स्वर्गात दाखल होणार नाही.)'' *(बुखारी)*

प्रलय

१) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह प्रलयकाळात जमिनीला समेटून घेईल आणि आकाशांना आपल्या उजव्या हातात गुंडाळून घेईल आणि म्हणेल, ''मी बादशाह आहे, कुठे

आहेत जमिनीचे बादशाह?'' *बुखारी*

२) माननीय अब्दुल्लाह इब्ने उमर (र) यांचे कथन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''प्रलयकाळात अल्लाह आकाशांना गुंडाळून घेईल आणि आपल्या उजव्या हातात त्यांना घेऊन म्हणेल की, 'कुठे आहेत अत्याचारी लोक! कुठे आहेत अतिरेकी लोक!' नंतर जमिनीला डाव्या हातात घेऊन (दुसऱ्या हातात घेईल असासुध्दा उल्लेख आहे) म्हणेल की, मी बादशाह आहे, कुठे आहेत अतिरेकी आणि गर्विष्ठ लोक!'' *(मुस्लिम)*

३) माननीय अबू मालिक असरी (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, मी तीन गोष्टी आपल्या दासांपासून लपवून ठेवल्या आहेत. जर त्या तीन गोष्टींना एखाद्याने जगात पाहिले तर तो कधीच कोणताही गुन्हा करणार नाही. मी जर माझ्या समोरून पडदा काढला आणि एखाद्याने मला पाहिले आणि जाणले की मी मृत्यूनंतर लोकांशी कसा व्यवहार करणार आहे. आणि कुणाला माहीत झाले की मी जमीन व आकाशांना (सृष्टी) कशा प्रकारे मुठीत घेऊन सांगेन, मी बादशाह आहे माझ्याशिवाय कुणाची ही बादशाही नाही. आणि मी आपल्या दासांना स्वर्ग आणि मी त्यांच्यासाठी जी साधनसामग्री बनवून ठेवली आहे ते सर्व दाखविले आणि त्यांनी विश्वास ठेवला. तसेच मी आपल्या दासांना नरक आणि जो कोप तयार केला आहे. ते सर्व दाखविले व त्यांनी विश्वास ठेवला. परंतु मी आपल्या नियोजनानुसार त्या सर्वांना गुप्त ठेवले आहे. परंतु त्यांचा खुलासा दासांजवळ केला आहे जेणेकरून हे माहीत व्हावे की ते कशा प्रकारे व्यवहार करीत आहेत.'' *(तबरानी)*

४) माननीय अनस (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''माझ्या अनुयांयापैकी दोन माणसे आपसात प्रभुसमोर भांडत राहातील. एक म्हणेल, ''हे प्रभो, माझ्या या भावापासून माझा हक्क मला परत मिळवून दे, जो याने अत्याचार करून घेतला.'' अल्लाह म्हणेल, ''हे कशा प्रकारे शक्य आहे, याच्याकडे काहीच पुण्य शिल्लक नाही? तो माणूस म्हणेल, ''प्रभो, माझे अपराध त्याच्या माथी मारून दे.'' प्रेषित हे सांगताना रडू लागले आणि म्हणाले, ''हा काळ (कयामत) असाच आहे की लोक आपले गुन्हे इतरांवर लादण्यास आतूर होतील.'' अल्लाह त्या अत्याचारित माणसाला विचारेल, ''आपली नजर वर करून पाहा.'' जेव्हा तो नजर वर करून पाहील तेव्हा म्हणेल, ''हे सोन्या-चांदीचे शहर आणि जडजवाहरांची घरे कोणत्या प्रेषितांचे, शहीदचे (हुतात्मा) आणि सत्यवादीचे आहेत?'' अल्लाह म्हणेल, ''जो याची किंमत चुकती करेल याचा तो मालक बनेल.''

तो म्हणेल, ''यांचा कोण मालक होणार?'' अल्लाह म्हणेल, ''तू मालक बनू शकतो.'' तो म्हणेल, ''मी कसा मालक बनणार बरे!'' अल्लाह म्हणेल, ''तुझ्या भावाला माफ करशील तर तू मालक बनशील.'' तो माणूस म्हणेल, ''हे माझ्या प्रभो, मी माझे हक्क माफ केले.'' अल्लाह म्हणेल, ''आपल्या भावाचा हात पकड आणि त्याला जन्नतमध्ये दाखल कर.''

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले आहे, ''अल्लाहचे भय बाळगा आणि आपापसात समेट घडवून आणा. पाहा, अल्लाह मुस्लिमांच्या दरम्यान समेट घडवून आणतो.'' *(हाकीम, बैहकी)*

५) माननीय वासिका बिन आस्का (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''कयामतमध्ये एका अशा दासाला जीवंत केले जाईल ज्याने एकही गुन्हा केला नसेल. अल्लाह त्याला म्हणेल, ''तुला तुझ्या कर्माचे फळ दिले जाईल. मी माझ्या कृपाशीलतेचा आणि दयाशीलतेचा उल्लेख करु?'' तो म्हणेल, ''हे प्रभु! तुला माहीत आहे की मी काहीच गुन्हा केला नाही आणि तुझी एकही अवज्ञा केली नाही.'' अल्लाह म्हणेल, ''माझ्या कृपेची त्याच्याशी तुलना कर.'' तुलना केली जाईल आणि शेवटी एकही नेकी शिल्लक राहणार नाही. सर्व नेककार्य (सदाचार) अल्लाहच्या उपकारांच्या बदल्यात संपून जातील. आता तो मनुष्य म्हणेल, ''हे प्रभो, मी तुझी कृपा आणि दयेचा इच्छुक आहे.'' तेव्हा अल्लाह म्हणेल, ''माझ्या कृपेने आणि दयेने याला स्वर्गात दाखल करा.''

मग दुसऱ्या एका माणसाला आणले जाईल जो स्वत:वर भलाई करणारा आणि सदाचारी असेल. त्याच्यावर एकही गुन्हा नसेल. त्याला म्हटले जाईल, ''तू माझ्या एखाद्या प्रिय दासाला मित्र बनविले होते किंवा माझ्या एखाद्या शत्रूशी शत्रूत्व केले होते काय?'' तो म्हणेल, ''प्रभो, मी या गोष्टीला पसंत करीत नव्हतो की माझ्यात आणि इतर दुसऱ्यामध्ये संबंध स्थापित व्हावे.'' अल्लाह म्हणेल, ''मला माझ्या इज्ज़तीची आणि प्रभुत्वाची शपथ! माझी कृपा आणि दया त्या व्यक्तीसाठी मुळीच नाही जो माझ्या प्रिय दासांपैकी कुणाशी प्रेम करत नाही आणि माझ्या शत्रूंपैकी एखाद्या शत्रूबरोबर शत्रुत्व करत नव्हता.'' *(तबरानी, हाकिम, तिरमिजी)*

६) माननीय इब्ने उमर (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह ईमानधारकांना जवळ घेईल आणि आपल्या संरक्षणात घेईल आणि म्हणेल, ''तू अशा गुन्ह्याला जाणतो काय? तू अशा अशा गुन्ह्याला ओळखतो काय?'' तो म्हणेल, ''होय माझ्या प्रभु; मी ओळखतो.'' अल्लाह अशा प्रकारे त्याच्या सर्व गुन्ह्यांची त्याच्याकडून खातरजमा करून घेईल. तो ईमानधारक

स्वत:ला म्हणेल, ''आता पुरता मारला गेलो.'' अल्लाह म्हणेल, ''मी जगात तुझे सर्व गुन्हे लपवून ठेवले होते आणि मीच आज तुझी मुक्ती करणार.'' शेवटी ईमानधारकांना सदाचाराचे कर्मपत्र दिले जाईल.

आता अनेकेश्वरवादी आणि विद्रोहींना दांभिकांना सर्वासमोर बोलावले जाईल आणि सांगितले जाईल, ''हे तेच लोक आहेत, ज्यांनी आपल्या निर्माणकर्त्यावर खोटे आरोप केले आहेत. जाणून असा अल्लाहचा धिक्कार अशाच अत्याचारी लोकांवर आहे.'' *(मुस्लिम)*

७) माननीय अबू ज़र (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले आहे, ''मी त्या व्यक्तीला ओळखतो जो सर्वांच्या मागे स्वर्गात दाखल होईल आणि सर्वात शेवटी जो नरकातून बाहेर निघेल.'' कयामत (प्रलय) काळात एका व्यक्तीला अल्लाह आदेश देईल, ''त्याच्यासमोर त्याचे लहान लहान अपराध ठेवले जावेत आणि त्याचे मोठे अपराध त्याच्यासमोर ठेवले जाऊ नयेत.'' त्या माणसाला सांगितले जाईल, ''तू अमुक दिवशी हे केले आणि अमुक अमुक दिवशी असे केले?'' तो म्हणेल, ''मी हे सर्व केले आहे.'' तो नकार देण्याचे साहस करू शकणार नाही आणि तो मोठ्या अपराधांपायी घाबरू लागेल की त्यांना समोर ठेवले जाऊ नये. अल्लाह म्हणेल, ''बरे, या दासाच्या प्रत्येक गुन्ह्याच्यासाठी एक पुण्य आहे.'' ही शुभवार्ता ऐकून आणि दयाशीलतेला पाहून तो त्वरित म्हणेल, ''हे माझ्या पालनकर्त्या प्रभु, मी काही आणखी अपराध केलेले आहेत. मी त्यांना येथे पाहू शकत नाही.'' माननीय अबू हुरैरा (र) म्हणतात, प्रेषित मुहम्मद (स.) हे वर्णन करताना हसत होते. *(मुस्लिम)*

८) माननीय अदी बिन हातिम (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''प्रलयकाळात (कयामत) काही लोकांना आदेश दिला जाईल, ''जन्नतकडे चालू लागा.'' जेव्हा हे लोक स्वर्गाजवळ जातील आणि सुंगधित वास घेतील आणि त्या महालांना पाहतील ज्यांना जन्नतमधील लोकांसाठी बनविले आहेत, तेव्हाच असा आवाज येईल, ''या लोकांना परत पाठवा. त्यांचा जन्नतप्रवेश निश्चित झालेला नाही.'' हे अत्यंत दु:खी होऊन परततील. त्यांच्या दु:खाची सीमा राहणार नाही. ते म्हणतील, ''हे आमच्या पालनकर्त्या प्रभु, हे स्वर्ग आणि स्वर्गातील ऐशोआराम आम्हाला दाखविण्याअगोदर आम्हाला नरकात टाकले असते तर बरे झाले असते. अल्लाह म्हणेल, ''हे मी तुम्हाला शिक्षा देण्याच्या उद्देशाने केले आहे. अभागीनों, तुम्ही जेव्हा सर्वांपासून वेगळे एकांतात राहत तेव्हा मोठमोठे गुन्हे आणि अपराध करीत असत आणि जेव्हा तुम्ही लोकांत येत होता तेव्हा अत्यंत

नरमीने आणि सदाचारीचा आव आणून वावरत असत. माझ्याबरोबर जो व्यवहार तुम्ही करीत होता लोकांसमोर त्याच्या विरुध्द प्रकट करीत होता. तुम्ही लोकांना भीत होता. तुम्हाला माझी भीती नव्हती. तुम्ही लोकांना श्रेष्ठ समजत होते आणि मला तुम्ही श्रेष्ठ समजून नव्हते. तुम्ही तर लोकांसाठी पवित्र बनत होता. परंतु माझ्यासाठी तुम्ही पवित्र बनून राहत नव्हते. आज मी तुम्हाला घोर यातना देईन आणि प्रत्येक प्रकारच्या मोबदल्यापासून तुम्हाला वंचित ठेवीन.'' *(बैहकी)*

स्वर्ग-नरक (जन्नत-जहन्नम)

१) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह म्हणतो की, मी आपल्या नेक दासांसाठी असे काही तयार करून ठेवले आहे की त्याला कोणत्याच मानवी डोळ्याने पाहिले नाही की कानाने ऐकले नाही की मानवी मनाने त्याविषयी विचार मनात आणला नसेल.'' तुम्हाला वाटले तर ही आयत वाचा, ''जसेकाही डोळ्यांचे पारणे फेडण्यासाठी नेक लोकांसाठी लपवून ठेवलेले आहे ज्याला कुणीही जाणत नाही.'' (अस्‌सजदा : १७) *(बुखारी, मुस्लिम, तिरमिजी, इब्न माजा*

२) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे; प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''जेव्हा अल्लाहने जन्नत आणि जहन्नम निर्माण केले तेव्हा जिब्रईल (अ) यांना जन्नतकडे पाठविले आणि अल्लाह म्हणाला, ''जन्नतला आणि त्यातील ऐशआरामाच्या वस्तूंना पाहून घ्या. ज्यांना मी जन्नतवाल्या लोकांसाठी बनविले आहे.'' प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, जिब्रेईल (अ) जन्नतमध्ये आले आणि जन्नतला आणि त्यातील साधनसामुग्रींना पाहिले, ज्यांना अल्लाहने जन्नती लोकांसाठी बनविले आहे. ते परत अल्लाहजवळ आले आणि अल्लाहच्या इज़्ज़तीची शपथ घेऊन सांगितले, जो कोणी याविषयी ऐकेल तो जन्नत (स्वर्ग) मध्ये दाखल होणारच. अल्लाहने नंतर जन्नतसाठी आदेश दिला आणि तिला संकटांनी आणि प्रयत्नांच्या पराकाष्ठेने घेरून घेतले. यानंतर अल्लाहने पुन्हा जिब्रईलशी सांगितले, ''परत जन्नतकडे जा आणि पाहून या की मी त्या जन्नतवासी लोकांसाठी त्यात काय करून ठेवले आहे.'' जिब्रईल जन्नतजवळ गेले, तर काय पाहतात की त्याला (स्वर्गाला) नावडत्या आणि कठीण गोष्टींनी घेरलेले आहे. ते परतले आणि अल्लाहच्या इज़्ज़तीची शपथ घेऊन सांगितले की मला आता तर शंका आहे की जन्नतमध्ये कोणीही प्रवेश करू शकणार नाही. अल्लाहने जेव्हा जहन्नम (नरक) बनविले तर जिब्रईलला सांगितले, ''जहन्नमकडे जा आणि त्याला पाहून या ज्याला मी

जहन्नमवासीयांसाठी तयार केले आहे. त्यांनी पाहिले की जहन्नमच्या ज्वाला एकमेकांवर प्रभावी होत आहेत. ते अल्लाहजवळ परत आले आणि सांगितले की तुझ्या इज्ज़तीची शपथ, जो कोणी याविषयी ऐकेल तो कधीच त्यात प्रवेश करण्याचा प्रयत्न करणार नाही. नंतर अल्लाहने जहन्नम (नरक) साठी आदेश दिला आणि त्याला वासनांनी आणि इच्छा आकांक्षांनी घेरून घेतले. नंतर अल्लाहने जिब्रईल (अ) यांना आदेश दिला, ''जहन्नमकडे परत जाऊन या.'' जिब्रईल तिकडे गेले आणि परत येऊन सांगतिले की तुझ्या इज्ज़तीची शपथ मला शंका आहे की जहन्नम (नरक) मध्ये दाखल होण्यापासून कोणीही वाचणार नाही.''

(तिरमिजी, अबु दाऊद, नसई)

३) माननीय अनस (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह त्या व्यक्तीला जो प्रलयकाळात सर्वांत कमी शिक्षेला पात्र असेल म्हणेल, ''जर जमिनीवरील सर्व वस्तू तुझ्या ताब्यात असतील तर तू त्या सर्व वस्तू या शिक्षेच्या मोबदल्यात देऊन टाकशील का?'' तो माणूस होकार देईल तेव्हा अल्लाह म्हणेल, '' मी तर तुझ्या जवळून यापेक्षा सोपी गोष्ट मागितली होती जेव्हा तू आदमच्या संततीपैकी होता, ती म्हणजे माझ्या बरोबरीने कुणा दुसऱ्याला सामील करू नकोस. परंतु तू माझा भागीदार बनवून बसला होता.''

(बुखारी, मुस्लिम)

४) माननीय अनस (र) यांचे निवेदन आहे, अल्लाहचे प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''नरकवाल्या लोकांपैकी प्रलयकाळात एक असा माणूस पुढे आणला जाईल जो जगात अति खुशाल होता. त्याला नरकाची चव चाखावयास दिली जाईल आणि नंतर त्याला विचारले जाईल, ''हे आदमपुत्र! तू खुशहालीला पाहून आलास काय? तुला ऐशोआरम मिळाला काय?'' तो म्हणेल, ''हे माझ्या निर्माणकर्त्या प्रभु, मी शपथेवर सांगतो कधीच ऐशोआराम पाहिला नाही.''

आणि जन्नती लोकांपैकी एकाला पुढे आणले जाईल जो जगात खडतर जीवन जगत होता. त्याला जन्नतची चव चाखावयास दिली जाईल आणि त्याला विचारले जाईल, ''हे आदमपुत्र! तू कधी काबाडकष्ट झेलले आहेस काय? कधी तू संकटांना सामोरे गेला होतास?'' तो म्हणेल, ''हे माझ्या पालनकर्त्या प्रभु, कधीच नाही. माझ्यावर कधीच कठीण परिस्थिती आली नाही की संकटांना सामोरे गेलो नाही. *(मुस्लिम)*

अल्लाहचे दर्शन

१) माननीय सुहेब (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''जेव्हा जन्नती लोक जन्नतमध्ये दाखल होतील तेव्हा अल्लाह म्हणेल, ''तुम्हाला मी आणखी काही मोबदला देऊ का?'' ते म्हणतील, ''तू आमचे चेहरे प्रकाशमान केले नाहीस काय? तू आम्हाला जन्नतमध्ये दाखल केले नाहीस काय? आम्हाला जहन्नमपासून तू वाचवले नाहीस? (आता आम्हाला आणखी काही नको.)'' प्रेषित मुहम्मद (स.) सांगतात की त्यावेळी पडदा उठविला जाईल आणि जन्नती अल्लाहचे दर्शन घेतील. त्यांना जो मोबदला दिला गेला त्यातील काहीच त्यांना आपल्या निर्माणकर्त्या प्रभुच्या दर्शनापेक्षा मौल्यवान वाटणार नाही. नंतर प्रेषितांनी कुरआन पठण केले, ''चांगल्यात चांगले करण्याऱ्यासाठी चांगला मोबदला आहे आणि याव्यतिरिक्त आणखी काही आहे.'' –*सूरह युनूस, १०* *(मुस्लिम)*

२) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''लोकांनी त्यांना एकदा विचारले, ''प्रलयाच्या काळात आम्ही आमच्या निर्माणकर्त्या प्रभुला पाहू शकू?'' प्रेषित म्हणाले, ''तुम्ही मध्यान्हाप्रहरी जेव्हा सूर्य ढगात लपलेला असतो तेव्हा त्याला सहज पाहता काय?'' साथीदारांनी होकार दिला. ''तसेच ज्या रात्री चंद्र पूर्ण असेल आणि तो ढगात लपलेलासुध्दा नसेल तर त्याच चंद्राला पाहण्यास तुम्हाला काही सन्देह वाटतो?'' त्यांनी नकारार्थी उत्तर दिले. यावर प्रेषितांनी सांगितले, ''शपथ आहे त्याची ज्याच्या हातात माझा जीव आहे! तुम्ही ज्या प्रकारे चंद्राला आणि सूर्याला पाहण्यास सन्देह ठेवत नाही त्याचप्रमाणे अल्लाहचे दर्शन घेण्यासाठी त्या काळात काहीएक संदेह असणार नाही.'' *(मुस्लिम)*

(३) माननीय जाबीर (र.) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''जेव्हा जन्नतमधील लोक स्वर्गाच्या ऐशोआरामात असतील तेव्हा त्यांच्यासाठी एक प्रकाशपूंज निर्माण होईल, ते आपले डोके वर करून पाहतील. ते पाहतील की त्यांचा निर्माणकर्ता त्यांच्यावर प्रगटला आहे. अल्लाह म्हणेल, ''तुमच्यावर शांतीचा वर्षाव होवो, जन्नतवासीयांनो!'' प्रेषितांनी सांगितले, ''अल्लाहच्या कथनाचा अर्थ होतो की दयाळू अल्लाहकडून सलाम आहे.''
(यासीन - ५८)

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाह त्यांच्याकडे नजर टाकील आणि ते त्याला पाहतील. ते जोपर्यंत अल्लाहकडे पाहत राहतील तोपर्यंत जन्नतच्या

कोणत्याच ऐशोआरामाकडे लक्ष देणार नाहीत. नंतर अल्लाह आणि त्यांच्यामध्ये पडदा पडेल आणि शिल्लक राहील एक प्रकाशपुंज.'' *(इब्नमाजा)*.

अल्लाहचा निर्णय

१) माननीय अबू हुरैरा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''अल्लाहने आदरणीय इब्राहीम (अ) यांना दिव्य प्रकटन केले, हे माझ्या मित्रा! तुमचा सद्व्यवहार, मग तो विद्रोही लोकांसाठी का असेना तुम्हाला सदाचारी लोकांच्या समूहात दाखल करील. मी हे अगोदरच स्पष्ट सांगितले आहे की ज्याची वागणूक चांगली आहे अशा माणसाला मी माझ्या राजसिंहासनाच्या सावलीत जागा देईन आणि जन्नतमध्ये दाखल करीन व माझा शेजारी बनविन.''

(हाकिम, तिरमिजी)

२) माननीय अबू उमामा (र) यांचे निवेदन आहे, प्रेषित मुहम्मद (स.) यांनी सांगितले, ''जेव्हा कोणी कर्ज घेतो आणि त्याची नियत परत करण्याची असते आणि तो मरण पावतो, तर अल्लाह प्रलयकाळात त्याचे कर्ज चुकते करतो. परंतु जो कोणी कर्ज घेतो आणि त्याला परत करण्याचा त्याचा इरादा नसतो आणि तो मरतो, तर अल्लाह प्रलयकाळात त्याला म्हणेल, 'तू समजून होता की माझ्या दासांचा हक्क मी मागणार नाही?' नंतर त्याचे पुण्य त्या कर्ज देणाऱ्या व्यक्तीला दिले जाईल. जर त्याच्याजवळ पुण्य नसेल तर कर्ज देणाऱ्या व्यक्तीचे गुन्हे त्याच्या माथी मारले जातील.'' *(तबरानी, हाकीम)*

३) माननीय अबू सईद खुदरी (र) यांचे निवदेन आहे, प्रेषित मुहम्मद (स) यांनी सांगितले, अल्लाह जन्नती लोकांशी म्हणेल, ''हे जन्नतच्या हकदारांनो!'' ते म्हणतील, ''हे आमच्या निर्माणकर्त्या प्रभु, आम्ही हाजीर आहोत, तुझ्या सेवेत सतत हजर आहोत आणि सर्व भलाई हे प्रभु, तुझ्याच हातात आहे.'' अल्लाह म्हणेल, ''तुम्ही आनंदी आहात काय?'' ते म्हणतील, ''आम्ही आमच्या पालनकर्त्याशी खूश का होणार नाही? त्याने तर आम्हाला सर्वकाही दिले आहे जे त्याने इतर निर्मितीला दिलेले नाही.'' अल्लाह म्हणेल, ''मी तुम्हाला यापेक्षासुध्दा उत्तम गोष्ट देवू?'' ते म्हणतील, ''हे आमच्या निर्माता, पालनहार प्रभु! यापेक्षा उत्तम काय असू शकेल?'' अल्लाह म्हणेल, ''मी तुमच्यावर माझी प्रसन्नता आणि खुशीचा वर्षाव करीन आणि यानंतर तुमच्याशी कधीही नाराज आणि नाखूश होणार नाही.'' *(बुखारी, मुस्लिम, तिरमिजी)*

✻ समाप्त ✻